पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ● अंक ५२ ● शुक्रवार, दि.२८ ऑगस्ट २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. https://epaper.citynewssuperfast.com

रक्षाबंधन

बहिण-भावाच्या रेशमी नात्यातील ओलावा जपणाऱ्या रक्षाबंधन सणाच्या हार्दिक शुभेच्छा..!



नातं प्रेमाचं वात्सल्याचं, आपुलकी, आणि जिव्हाळ्याचं

## »थोडक्यात

### तिबेटमध्ये पुन्हा तलाव फुटला

**नवीदिल्ली:** नेपाळ-तिबेट सीमेजवळ आणखी एक तलाव फुटला आहे. चोचेन नदी आणि पुरेपू त्सांगपो नदीच्या संगमाजवळ हा तलाव तयार झाला होता. चीनने एक दिवस आधीच तो फुटण्याची शक्यता व्यक्त केली होती. तलाव फुटल्यानंतर खालच्या भागातील नद्यांची पाणी पातळी वाढत आहे. परिणामी, रासुवा जिल्ह्यातील बचावकार्य ९० मिनिटांसाठी थांबवण्यात आले आहे. नदीच्या वाटेत येणारी गावे रिकामी केली जात आहेत. लोकांना आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांना तात्काळ सुरक्षित ठिकाणी जाण्यास सांगण्यात आले आहे.

### कार्यक्रमात चेंगराचेंगरी

**बरेली** उत्तर प्रदेशातील बरेली येथील भाजपाचे महापौर उमेश गौतम यांच्या रक्षाबंधन कार्यक्रमात मोठा गोंधळ झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याच दरम्यान चेंगराचेंगरी झाली. या कार्यक्रमाला हजारो महिलांनी हजेरी लावली होती. गर्दीमुळे अनेक महिला चिरडल्या जाऊन बेशुद्ध झाल्या. या दुर्घटनेत एका महिलेचा मृत्यूही झाला आहे.

# स्नेहाचा धागा, विश्वासाचा सोबती: 'आपुलकीची राखी'











# घट्ट झाली नात्यांची वीण!

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**दिल्ली/मुंबई/अकोला:** वात्सल्य, प्रेम आणि विश्वासाचा अनोखा संगम असलेला रक्षाबंधनाचा सण आज राज्यभरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वसामान्यांच्या घरांपासून ते राजकीय वर्तुळापर्यंत प्रत्येक ठिकाणी भाऊ-बहिणीच्या अतुट नात्याचा गोडवा पाहायला मिळाला. चिमुकल्यांपासून ते ज्येष्ठ नेत्यांपर्यंत सर्वांनीच हा सण आपुलकीने साजरा करत एकमेकांना शुभेच्छा दिल्या. दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना चिमुकल्या बहिणींनी अत्यंत प्रेमाने राखी बांधून त्यांच्या उदंड आयुष्यासाठी प्रार्थना केली. तर मुंबईत चिखलीच्या आमदार श्वेता महल्ले यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राखी बांधून औक्षण केले. राजकीय व्यस्ततेच्या पलीकडे जाऊन जपलेला हा आपुलकीचा क्षण सर्वांचेच लक्ष वेधून घेणारा ठरला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शेकडो बहिंनीसह रक्षाबंधन साजरी केली. अकोल्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील घराघरांत आज या पवित्र नात्याच्या विविध देखण्या छटा पाहायला मिळाल्या.शिवसेना (उबाठा) उपनेत्या सुषमा अंधारे यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन त्यांना राखी बांधली. मुंबईत मंत्री पंकजा मुंडे आणि मंत्री अदिती तटकरे यांनी धनंजय मुंडे यांना राखी बांधून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी आमदार प्रसाद लाड यांना राखी बांधत या विश्वासाच्या नात्याला उजाळा दिला. दुसरीकडे, दिवंगत नेते अजित पवार यांच्या आठवणीने खासदार सुप्रिया सुळे भावुक झाल्या होत्या. दादांच्या अनुपस्थितीत साजरी होणारी ही राखीपौर्णिमा मन अस्वस्थ करणारी असल्याचे त्यांनी भावना व्यक्त करताना सांगितले. आमदार रोहित पवार यांनीही भावनिक पोस्ट करत दादांच्या आठवणींना उजाळा दिला. एकंदरीत, राजकीय धकाधकी बाजूला ठेवून एकमेकांप्रति आदर आणि प्रेम व्यक्त करणारा हा रक्षाबंधनाचा सण संपूर्ण राज्यात मोठ्या आनंदाने पार पडला.



## शिरसाट-बावनकुळेंना सोडणार नाही

**जालना:**एकनाथ शिंदे यांनी संजय शिरसाट यांना पुढे करून, तर देवेंद्र फडणवीस यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांच्यामार्फत मराठा समाजाचे वाटोळे केले आहे. आम्ही यापैकी कोणालाही सोडणार नाही. जर आम्हाला प्रमाणपत्रे दिली तर आमचे प्रेम पूर्वीसारखेच राहील; अन्यथा कोणाचीही गय केली जाणार नाही. ज्यांचे असे म्हणणे आहे की ही प्रमाणपत्रे कायद्याच्या कसोटीवर रद्द झाली, त्यांनी अंतरवलीला येऊन ते सिद्ध करून दाखवावे, असा इशारा मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी दिला.मनोज जरांगे म्हणाले की, एकाच कुटुंबात बहिणीला जात पडताळणी प्रमाणपत्र (व्हॅलिडिटी) मिळते, मग भावाचे प्रमाणपत्र रद्द कसे होऊ शकते? जात पडताळणी अधिकारी व्हॅलिडिटीबाबत अधिकृत पत्र देणार असताना, संजय शिरसाट आणि चंद्रशेखर बावनकुळे ते रद्द करायला सांगत आहेत.

## सप्टेंबर महिन्यात एवढ्या दिवस बँक राहणार बंद

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**अकोला:** सप्टेंबर महिन्यात बँकेशी संबंधित महत्त्वाचे काम असेल तर ग्राहकांनी आधीच नियोजन करणे गरजेचे आहे. बँक कर्मचाऱ्यांच्या संघटनेने विविध मागण्यांसाठी सप्टेंबरमध्ये देशव्यापी संपाची घोषणा केली आहे. ११ सप्टेंबरला एक दिवसाचा, तर २८, २९ आणि ३० सप्टेंबरला सलग तीन दिवसांचा संप होणार आहे. पाच दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करणे, तसेच परफॉर्मन्स लिंक्ड इन्सेंटिव्हच्या नियमांबाबत संघटनांच्या मागण्या आहेत. याशिवाय सप्टेंबरमध्ये रविवार आणि दुसरा-चौथा शनिवार यामुळे नियमित सुट्ट्या आहेत. ४ सप्टेंबरला जन्माष्टमी आणि १४ सप्टेंबरला गणेश चतुर्थीची सुट्टी काही राज्यांमध्ये आहे.

### साप्ताहिक सुट्ट्या

- ६ सप्टेंबर: रविवार
- १२ सप्टेंबर: दुसरा शनिवार
- १३ सप्टेंबर: रविवार
- २० सप्टेंबर: रविवार
- २६ सप्टेंबर: चौथा शनिवार
- २७ सप्टेंबर: रविवार

## CLASSIFIED

**प्रवेश देणे सुरू आहे**

आय.टी.आय.
व १२ वी समकक्ष कोर्सेस
१) इलेक्ट्रीशियन २ वर्ष
(२) बांधकाम पर्यवेशक १ वर्ष प्रवेश
पात्रता : - १० वी, १२ वी पास /नापास, टक्कवारीची अट नाही डायरेक्ट ऑनलाईन प्रवेश.
संपर्क
स्नेहदीप व्होकेशनल
ज्युनिअर कॉलेज, SBI बँकेच्या वरं, राठीनगर, अमरावती
8087958087

**शेती विकणे आहे**

मौजा चांदूर, ता.जि अकोला येथील शेत सर्व्हे नं. 188/2 आईच्या शाळेसमोर व प्रभात किड्सच्या मागील बाजूस, नगर पालिकेच्या बॉर्डरला लागून उत्तम लोकेशनचे आहे. लेआउटचे शेत 84 आर. लेआउटचे शेत विकणे आहे.
शरदचंद्र नेवास्कर
9822702276

## साठ रुपयात दोन किलो साखर आणि अर्धा किलो तेल!

### ठगणाऱ्या टोळीला लोकांनी दिला चोप

प्रतिनिधी २८ ऑगस्ट



**अकोला:** ऐन सणासुदीच्या दिवसात सध्या साखर आणि तेलाचे भाव गगनाला भिडल्याने सामान्य माणूस हवालदिल झाला आहे. गरिबांच्या याच मानसिकतेचा फायदा घेत जुने शहर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या हरिहर पेठ परिसरात ट्रू रियालिटी चेंज लाईफ फाउंडेशन ची पाटी लावून लोकांना साठ रुपयात दोन किलो साखर आणि अर्धा किलो तेल देण्याच्या नावाखाली लोकांकडून फॉर्म भरून घेण्यात आले तसेच लोकांचे आधार कार्ड राशन कार्ड व दोन फोटो सुद्धा घेण्यात आले. फॉर्म जमा करण्यासाठी महिलांची गुरुवारी दिवसभर झुंबड उडाली होती. शेकडो महिलांनी दोन किलो साखर आणि अर्धा किलो तेलाच्या लालसेपायी साठ रुपये व कागदपत्रे जमा केली होती. परंतु याची कुनकुन परिसरातील काही जागृत नागरिकांना आल्यावर त्यांनी या ट्रू रियालिटी चेंज लाईफ फाउंडेशन कंपनीच्या कर्मचाऱ्यांची चौकशी केली असता त्यांनी त्यांच्याकडे कुठलीही शासकीय परवानगी नसल्याचे स्पष्ट केल्यानंतर व लोकांना साखर तसेच तेल केव्हा मिळेल याची काही माहिती नसल्याचे सांगितल्यावर लोकांचा पारा चढला व त्यांनी या कर्मचाऱ्यांना चांगलाच चोप दिला. घटनेची माहिती मिळताच जुने शहर पोलीस स्टेशनचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले होते त्यांनी या कर्मचाऱ्यांना नागरिकाच्या तावडीतून वाचवून पोलीस स्टेशनला आणले.

### लोकांनी अशा ठगांपासून सावध राहावे

गेल्या दोन दिवसांपासून नागरिकांकडून साठ रुपये तसेच त्यांची कागदपत्रे जमा केली जात होती यांच्याकडे कुठलीही शासकीय परवानगी नव्हती सरकारी धान्य दुकाने असताना लोकांनी अशा ठगांपासून सावध राहावे विनाकारण आपली कागदपत्रे देऊन आपली फसवणूक करून घेऊ नये असे आवाहन परिसराचे नगरसेवक अमोल मोहोकार यांनी केले

### जमा केलेल्या कागदपत्रांची नागरिकांनी केली होळी



साठ रुपयात दोन किलो साखर आणि अर्धा किलो तेल मिळणार या भाबड्या आशेने महिलांनी या भामट्यांकडे कागदपत्रे जमा केली होती या कागदपत्रांचा काही दुरुपयोग होऊ नये म्हणून नागरिकांनी जमा केलेल्या या कागदपत्रांची होळी केली.

### अकोला महापालिकेत BPMS प्रणालीतील त्रुटींचा गैरवापर

## लेआउट मंजुरीत मोठा घोळ उघड !

### खाजगी अभियंते व अधिकाऱ्यांच्या संगनमताने गैरप्रकार
### आयुक्तांकडून राज्यस्तरीय चौकशीची गरज केली गेली व्यक्त

प्रतिनिधी २८ ऑगस्ट



**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत इमारत बांधकाम व लेआउट परवानग्या देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या BPMS (Building Plan Approval Management System या ऑनलाइन प्रणालीतील तांत्रिक त्रुटींचा अनुचित फायदा घेऊन शहरातील काही अभियंते व अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचा खळबळजनक आरोप वंचित नगरसेवक सुनील इन्नाणी यांनी केला आहे. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत ज्येष्ठ नगरसेवक सुनील इन्नाणी यांनी या संदर्भात गंभीर आरोप करत पुराव्यांसह तक्रार दाखल करण्याची तयारी दर्शवली आहे.
सभेदरम्यान बोलताना नगरसेवक सुनील इन्नाणी यांनी सांगितले की, 'शहरातील काही अभियंत्यांनी हेतुपुरस्सर BPMS प्रणालीतील तांत्रिक पळवाटांचा आणि त्रुटींचा अभ्यास करून लेआउट मंजुरीमध्ये मोठ्या प्रमाणात गडबडी केल्या आहेत. या प्रकरणाशी संबंधित सर्व कागदपत्रे आणि पुरावे उपलब्ध असून, ते लवकरच महापालिका आयुक्तांकडे लेखी स्वरूपात सोपवले जातील.' महापौरांनी दोषींची नावे थेट जाहीर करण्याची सूचना केली असता, 'प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता व चौकशीवर परिणाम होऊ नये म्हणून सर्व दोषींची यादी आणि कागदपत्रे आयुक्तांनाच दिली जातील,' असे इन्नाणी यांनी स्पष्ट केले.नगररचना विभागातील या उघडकीस आलेल्या प्रकारामुळे भूमाफिया आणि अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, आता महापालिका प्रशासन यावर काय कारवाई करते याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

### राज्यभरातील ४०० नागरी संस्थांवर सावट ?

या मुद्द्याची गंभीर दखल घेत महापालिका आयुक्त डॉ.सुनील लहाने यांनी प्रशासनाची बाजू मांडली. आयुक्त म्हणाले,BPMS ही प्रणाली केवळ अकोला महापालिकेपुरती मर्यादित नसून संपूर्ण महाराष्ट्रातील सुमारे ४०० हून अधिक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वापरली जाते. जर या प्रणालीत काही तांत्रिक त्रुटी असतील आणि त्याचा गैरफायदा घेतला जात असेल, तर हा अत्यंत गंभीर आणि संपूर्ण राज्याशी संबंधित विषय आहे.' या तांत्रिक त्रुटींसंदर्भात राज्य शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे तातडीने 'तिकिट ट्रेस' करून तक्रार नोंदवली जाईल, जेणेकरून या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढता येईल.तांत्रिक त्रुटींचा गैरवापर करून बेकायदेशीर मंजुरी देणाऱ्या संबंधित खाजगी अभियंत्यांवर आणि अधिकाऱ्यांवर कागदपत्रांची छाननी करून कडक कारवाई केली जाईल.

# थकीत देयकांमुळे तरुण ठेकेदाराची आत्महत्या

## अकोला जिल्हा कॉन्ट्रॅक्टर अँड इंजिनिअर्स असोसिएशनचे प्रशासनाला निवेदन

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**अकोला:** शासकीय विकासकामांची देयके (बिल) दीर्घकाळापासून प्रलंबित राहिल्याने आर्थिक संकटात सापडलेल्या गजानन देवकते या तरुण ठेकेदाराने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.
या घटनेच्या पार्श्वभूमीवर अकोला जिल्हा कॉन्ट्रॅक्टर अँड इंजिनिअर्स असोसिएशनने आक्रमक भूमिका घेत शासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन प्रलंबित देयके तत्काळ अदा करण्याची आणि पीडित कुटुंबाला आर्थिक आधार देण्याची मागणी केली आहे.हे निवेदन देताना अकोला जिल्हा कॉन्ट्रॅक्टर अँड इंजिनिअर्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप उर्फ बंडूभाऊ देशमुख, उपाध्यक्ष राजेश घुले, कार्याध्यक्ष अनंता राजनकर, सरचिटणीस एच. एस. ठाकूर, कोषाध्यक्ष तुषार उजवणे यांच्यासह असोसिएशनचे इतर पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.
गेल्या दोन-तीन वर्षांपासून विविध शासकीय विभागांमध्ये निधीची प्रचंड चणचण भासत आहे. यामुळे शासकीय कामे करणाऱ्या ठेकेदारांची मोठी आर्थिक कोंडी झाली आहे. अनेक ठेकेदारांनी बँकेकडून कर्जे काढून, व्याजाने पैसे घेऊन, बाजारातून उधारीवर साहित्य खरेदी करून शासकीय विकासकामे पूर्ण केली. मात्र, कामे पूर्ण झाल्यानंतरही शासनाकडून वेळेत देयके मिळत नसल्याने कर्जाचे हप्ते, व्याज, उधारीचे तगादे आणि इतर कौटुंबिक व आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडणे ठेकेदारांसाठी अशक्य होऊन बसले आहे.



### मुख्यमंत्र्यांनी तात्काळ हस्तक्षेप करण्याची मागणी

या गंभीर आणि दुर्दैवी परिस्थितीची राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी तात्काळ दखल घ्यावी, अशी मागणी असोसिएशनने केली आहे. स्वर्गीय गजानन देवकते यांनी पूर्ण केलेल्या कामांची ज्या-ज्या शासकीय विभागांकडे देयके प्रलंबित आहेत, ती त्वरित वितरित करण्याचे निर्देश देण्यात यावेत. तसेच, देवकते यांच्या शोकाकुल कुटुंबाला शासनाकडून तातडीने आवश्यक आर्थिक मदत मिळावी, अशी आग्रही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. भविष्यात अशा दुर्दैवी घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व शासकीय विभागांमधील थकीत निधी त्वरित वितरित करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे.

### बँक खाती 'एनपीए'च्या उंबरठ्यावर; मानसिक ताण वाढला

असोसिएशनने दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, देयके रखडल्यामुळे अनेक ठेकेदारांची बँक खाती बिगर-व्यवहारी (र्झ्A) होण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे त्यांच्या आर्थिक पतसोबतच सामाजिक पतही धोक्यात आली आहे. विशेषतः नव्याने या क्षेत्रात आलेल्या युवा ठेकेदारांवर या आर्थिक संकटाचा अत्यंत गंभीर मानसिक आणि सामाजिक परिणाम होत असून, ते नैराश्याच्या गर्तेत ढकलले जात आहेत.



सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

२

शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# बहीण भावाच्या नात्याचे अतूट बंधन

रक्षाबंधन म्हणजे बहीण-भावाच्या प्रेमाचे बंधन! या दिवशी बहिण भावाच्या हातावर राखी बांधून भावाचे ह्रदय प्रेमाने जिंकून घेते. हा सण म्हणजे पराक्रम, प्रेम, साहस किंवा संयमाचा संयोग होय. जगातील सर्व नात्यांमध्ये भाऊ-बहिणीचे प्रेम निस्वार्थी आणि पवित्र असते. भारतीय संस्कृतीतील पूर्वजांनी या नात्यातील निस्पृहता आणि पवित्रतेचा महिमा गायला आहे. भारतीय संस्कृती मानव जीवनाच्या महानतेचे दर्शन घडविणारी संस्कृती आहे. स्त्रीला भोगवस्तू न समजता तिची पूजा करणारी संस्कृती आहे.

स्त्री समानतेची पोकळ भाषा बोलणाऱ्या सुधारकांना किंवा पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करणाऱ्यांना नम्रतापूर्वक सांगितले पाहिजे, की भारतीय संस्कृतीने स्त्रीची पूजा केली आहे. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:' जिथे स्त्रियांची पूजा, तिचा सम्मान केला जातो तिथे देवांचा वास असतो असे मनूने म्हटले आहे. स्त्रीकडे भोगाच्या दृष्टीकोनाऐवजी पवित्र दृष्टीने, आईच्या भावनेतून पाहण्याचा संदेश देणारी भारतीय संस्कृती आहे.

रक्षाबंधनाचा सण म्हणजे दृष्टी परिवर्तनाचा सण! बहिणीने हातावर राखी बांधताच भावाची दृष्टी बदलते. राखी बांधणाऱ्या बहिणीकडे तो विकृत नजरेने पाहत नाही. समाजात आपली बहिण ताठ मानेने वागावी म्हणून तिच्या संरक्षणाची जबाबदारी स्वतःकडे घेतो. मात्र आज तिची मस्करी करणाऱ्या आणि जनावरांप्रमाणे वागणूक देणाऱ्या भावांना



समजावून सांगण्याची गरज आहे.

बहिण भावाला राखी बांधण्यापूर्वी त्याच्या कपाळावर टिळा लावते. हे केवळ भावाच्या कपाळाची पूजा करण्यासाठी नव्हे तर त्याचे विचार आणि बुद्धीवरील विश्वासाचे दर्शन आहे. भावाच्या कपाळावर टिळा लावताना सामान्य वाटणाऱ्या या क्रियेत दृष्टी परिवर्तनाच्या महान प्रक्रियेचा समावेश आहे. सामान्य दृष्टीने जगाकडे पाहणाऱ्या नजरेशिवाय भावनात्मक दृष्टीने जगाकडे पाहण्यासाठी एक पवित्र तिसरा डोळा बहिणी आपल्या भावाला देऊन त्रिलोचन बनविते, असा संकेत या क्रियेमध्ये दिसून येतो. भगवान शंकराने तिसरा डोळा उघडून मदनाला भस्म केले होते. त्याप्रमाणे तिसऱ्या डोळ्याच्या रूपात बहिण भावाला आजार, वासना इत्यादी भस्म करण्याची सूचना करते. बहिण भावाच्या हातावर राखी बांधून केवळ आपले संरक्षण मागत नाही, तर सर्व स्त्री जातीच्या संरक्षणाची मनोकामना ठेवते, तसेच बाह्य शत्रूपासून आणि अंतर्विकारांपासून आपला भाऊ विजय प्राप्त करो किंवा सुरक्षित राहो ही भावना पण त्यात असते.

देवासुर संग्रामात देवांच्या विजयासाठी इंद्राणीने हिम्मत हरवलेल्या इंद्राच्या हातात राखी बांधली होती, असे वेदात सांगितले आहे. अभिमन्यूच्या सुरक्षेसाठी कुंतीने त्याला राखी बांधली होती आणि आपल्या संरक्षणासाठी राणी कर्मवतीने हुमायूँला राखी पाठवली होती. या राखीमध्ये सुरक्षिततेची भावना होती.

रक्षाबंधन हे सुरक्षिततेचे स्मारक आहे. राखी बांधल्याने एक बंधन आपल्यावर असते. हे बंधन असते ध्येयच्युत न होण्याचे. या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करण्याची आठवण राखी देते. राखी बांधताना बहिण भावाचे बंधन किंवा ध्येयाचे रक्षण करण्याची सूचना करते. "स्त्रीकडे विकृत दृष्टीने न पाहता तिच्या प्रती पवित्र दृष्टी ठेवा" असा महान संदेश देणाऱ्या या भारतीय संस्कृतीच्या सर्वश्रेष्ठ सणाला आपण कुटुंबापुरतेच मर्यादित ठेवले आहे. अशा सुंदर प्रेम आणि भावबंधनाच्या सणाला कुटूंबापुरतेच मर्यादित ठेवणे योग्य नाही. सख्या भावाकडे बहिणीची दृष्टी निर्मळ आणि प्रेमपूर्ण राहील. समाजात स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलण्याची आवश्यकता आहे. सख्ख्या बहिणीने सख्ख्या भावाला राखी बांधण्यापेक्षा समवयस्क एखाद्या बहिणीने दुसऱ्या भावाला राखी बांधल्यास त्यामध्ये शील रक्षणाची जबाबदारी येते. सारांश, रक्षाबंधन म्हणजे स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलणे, रक्षाबंधन म्हणजे भावाने बहिणीच्या रक्षणाची जबाबदारी घेणे, रक्षाबंधन म्हणजे बहिण-भावाच्या शुद्ध प्रेमाचा वाहता निर्झर! भाऊ आणि बहिण परस्पर प्रेरक, पोषक आणि पूरक आहेत हा संदेश देणारा हा उत्सव भारतीय संस्कृतीची अमूल्य देन आहे.

**-पांडुरंगशास्त्री आठवले**

# मराठी लोकसंगीताचे अनभिषिक्त सम्राट राम कदम



**आज राम कदम यांची जयंती**

रामचंद्र वासुदेव कदम हे राम कदम यांचे पूर्ण नाव. त्यांचा जन्म 28 ऑगस्ट 1916 रोजी झाला. राम कदम हे मुळचे जिल्हा सांगली मधील मिरज गावाचे रहिवासी होते. बालपणापासूनच त्यांना संगीताची आवड होती. मिरजेत त्यांच्या वडिलांची खानावळ होती. राम यांनी मिरजच्या महाराष्ट्र विद्यालयात तिसरीपर्यंत शिक्षण घेतले. लहानपणीच ते मिरजच्या अपान्ना गंगावणे यांच्या मेळ्यात बुलबुलतरंग वाजवत व गाणीही म्हणत. हाच मेळा पुढे करमरकरांचा मेळा म्हणून प्रसिद्धीला आला. छोट्या वयातच राम यांना या मेळ्यात खूप संधी मिळाल्यामुळे लहान वयातच बक्षिसांबरोबरच त्यांचे कौतुकही खूप झाले.

राम कदम यांना लहान वयातच संत गाडगेबाबांबरोबर राहायला मिळाले. त्यांच्या भजनात राम कदम बुलबुलतरंगची साथ करीत. त्यांच्या वडिलांचे हॉटेल फारसे चालत नसे. गरिबीमुळे राम कदम यांनी मिरजेच्याच जनरल ब्रास बँडमध्ये नोकरी केली. सुरुवातीला हरकाम्या म्हणून ते कार्यक्रमामधली वाद्ये पुसत. तिथे त्यांनी एकदा क्लॅरियोनेट वाजवून पाहिले, म्हणून वादकाने त्यांच्या थोबाडीत मारली. त्या तिरमिरीत 'मी स्वत:चे क्लॅरियोनेट घेऊनच परत येईन', अशी प्रतिज्ञा करून ते घराबाहेर पडले. दुसऱ्या गावी जाऊन स्वत:च्या कमाईतून क्लॅरियोनेट घेऊनच मिरजेला परतले. मिरजेचे बँडमास्टर चांदलाल यांनी राम कदम यांना क्लॅरियोनेट वादनामध्ये तयार केले. मधल्या काळात त्यांना खांसाहेब अब्दुल करीम खां यांच्याकडे गाणे शिकण्याची संधी मिळाली.

पुढे चांदलाल यांनीच कदम यांना पुण्याच्या 'प्रभात'मध्ये काम करण्यासाठी पाठवले. 'प्रभात'मध्ये मिरजेचे ई.महंमद हे छायाचित्रकार म्हणून उमेदवारी करत होते. त्यांनीच रामची प्रभातमध्ये वर्णी लावली. कदम सुरुवातीला गड्याचे काम करीत, पण वादक म्हणून त्यांची लवकरच बढती झाली. प्रभातमध्ये केशवराव भोळे व मा. कृष्णराव अशा दिग्गज संगीतकारांच्या हाताखाली त्यांना शिकायला मिळाले. शिवाय नवयुग व शालिमार स्टुडियोत ते क्लॅरियोनेट वाजवायला जात. तिथे अनेक संगीतकारांच्या हाताखाली काम करण्याचा अनुभव त्यांना मिळाला. त्यातून त्यांच्यामधला संगीतकार तयार होत गेला. सुधीर फडके व वसंत पवार यांचे साहाय्यक म्हणूनही त्यांनी काम केले.

१९५१ साली 'गावगुंड' या चित्रपटापासून कदम यांची कारकिर्द सुरू झाली. १९६५ पर्यंत - म्हणजे सुमारे पंचवीस चित्रपट होईपर्यंत त्यांना सूर सापडत नव्हता. 'केला इशारा जाता जाता' या चित्रपटापासून मात्र त्यांची घोडदौड सुरू झाली. याच सुमारास संगीतकार व लावणीसम्राट वसंत पवार यांचे निधन झाले. मग 'लावणीचे शिवधनुष्य' या रामने यशस्वीरीत्या पेलले.

लावणीव्यतिरिक्त मराठी लोकसंगीतातील झगडा, भूपाळी, विराणी, गवळण, भारूड, पोतराज, वासुदेव, नागोबाची - हळदीची गाणी, धनगरगीते, कोळीगीते, मोटेवरची गाणी, गौरी-हादगा-मंगळागौरीची स्त्रीगीते असे सर्व प्रकार त्यांनी मराठी रसिकांना दिले. 'पिंजरा' या शांतारामबापूंच्या चित्रपटामुळे कदम यांनी कर्तृत्वाच्या यशाचे शिखर गाठले. ४५ वर्षांच्या सांगीतिक कारकिर्दीत ११३ मराठी, ३ हिंदी, १ तेलगू चित्रपट व २५ नाटके या साऱ्यांतून दिलेल्या लोकसंगीतातून अस्सल मराठी मातीचे संगीत देताना त्यांनी 'प्रभात'मधील अभिजात संगीताचे संस्कार तर जपलेच, शिवाय मराठी लावणीचे लावण्यही खुलवले.

राम कदम हे मराठी लोकसंगीताचे अनभिषिक्त सम्राट होते. सूरसिंगारचे 'बृहस्पती ॲवॉर्ड' व 'स्वामी हरिदास पुरस्कार', याशिवाय 'एकटा जीव सदाशिव' (१९७४), 'सुगंधी कट्टा' (१९७६), 'पैज' (१९८०) व 'साईबाबा' (१९९५) या चित्रपटांना उत्कृष्ट संगीताचे राज्य शासनाचे पुरस्कार मिळाले होते. 'संगीतकार राम कदम' हे मधू पोतदार लिखित चरित्र प्रकाशित झाले आहे. राम कदम यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या नावाने संगीतातील मान्यवर व्यक्तींना दर वर्षी दोन पुरस्कार दिले जातात.

कदम यांनी सुरुवातीला दक्षिण महाराष्ट्रातील मिरज येथे एका बँडमध्ये क्लॅरिनेट वाजवले. त्यानंतर, त्यांनी मिरज येथील किराणा घराण्याचे अध्वर्यू, प्रख्यात शास्त्रीय गायक उस्ताद अब्दुल करीम खान यांच्याकडून शास्त्रीय गायन शिकले. त्यानंतर, त्यांनी प्रख्यात तमाशा गायक पट्टे बापूराव यांच्याकडून लावणी लोकगायन शैली देखील शिकली . संगीतकार म्हणून त्यांचा शेवटचा चित्रपट अजय सरपोतदार दिग्दर्शित पैंजन (1995) होता. १९ फेब्रुवारी १९९७ रोजी पुण्यात वयाच्या ७९ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. मधु पोतदार यांनी त्यांचे चरित्र, छिन्नी हातोड्याचा घाव लिहिले आहे. राम कदम यांना विजय आणि उदय कदम असे दोन मुलगे आहेत. त्यांचा मोठा मुलगा विजय कदम हा देखील संगीतकार आहे.

# राखीचा धागा आणि संवेदनशीलतेचा पर्यावरण संदेश

काही बातम्या प्रासंगिक असतात; त्या एखाद्या सणाशी, उत्सवाशी किंवा विशिष्ट दिवसाशी निगडित असतात. पण त्यांपैकी काही बातम्या आपल्या संवेदनशील मानवी मनाचे आणि सजग समाजाचेही लक्ष वेधून घेतात. केकत उमरा येथील चेतन सेवांकुर आश्रमातील दृष्टीहिन मुलांनी वनरक्षेच्या धाग्याला सामाजिक जाणिवेची सुंदर वीण देत तयार केलेल्या राख्या ही अशीच एक आश्वासक बातमी काल वाचण्यात आली. राखी हा केवळ रंगीत धागा नसतो. तो नात्यांचा विश्वास असतो, जिव्हाळ्याचा स्पर्श असतो आणि संरक्षणाच्या वचनाची भावनिक अभिव्यक्ती असते. याच राखीचा धागा जेव्हा निसर्गनिर्मित वस्तूंपासून साकारला जातो, तेव्हा त्याचे अर्थविश्व अधिक व्यापक होते. पर्यावरणाला ओरबाडून नव्हे, तर निसर्गाशी मैत्री करूनही कलात्मकता फुलविता येते, हा संदेश या उपक्रमातून समर्थपणे पुढे येतो.

आजच्या प्लास्टिकमय, कृत्रिम आणि 'बाजारपेठकेंद्री' सणोत्सवांच्या काळात ग्रामीण भागातील मुलांनी शेवाळ, पावसाळ्यातील रंगीत फुले, नैसर्गिक पाने आणि परिसरातील विविध वस्तूंचा कल्पकतेने उपयोग करून राख्या तयार करणे, ही केवळ कलाकृतीची बाब नाही; ती 'पर्यावरणवादी संस्कारांची पेरणी' आहे. याप्रसंगी दोन ओळी महत्त्वाच्या वाटतात.....

" दृष्टी नसली तरी जपली निसर्गाशी नाती, ष्टिहीन हातांनी गुंफली पर्यावरणपूरक राखीची प्रीती!'.

निसर्गातील वस्तूंकडे 'संसाधन' म्हणून नव्हे, तर 'सहजीवनाचे साथीदार' म्हणून पाहण्याची ही सुंदर दृष्टी आहे.

या राख्यांमध्ये कलेची कोमलता आहे, निसर्गाचे सौंदर्य आहे आणि सामाजिक बांधिलकीची हिरवीगार जाणीवही आहे. ग्रामीण भागातून संपूर्ण महाराष्ट्राला गेलेला हा संदेश म्हणूनच महत्त्वाचा वाटतो. 'रक्षण' हा शब्द केवळ बहिणीच्या सुरक्षेपुरता मर्यादित न राहता वृक्ष, वन, जल आणि पर्यावरणाच्या संरक्षणाशी जोडला गेला पाहिजे.

खरे तर, या मुलांनी तयार केलेली प्रत्येक राखी जणू समाजाच्या मनगटावर बांधलेली एक आठवण आहे—नाती जपा, निसर्ग जपा आणि संवेदनशीलतेचे धागे तुटू देऊ नका!

**प्रा. डॉ. सुहास उगले,**
अकोला

# श्रावण महिना निसर्गाशी नाते जुळलेले पर्व

महाराष्ट्र आणि संपूर्ण भारतीय संस्कृतीत श्रावण महिन्याला विशेष पवित्र स्थान आहे. हा महिना केवळ ऋतू बदलाचा नसून, निसर्ग आणि अध्यात्माचा सुंदर संगम मानला जातो. श्रावणात निसर्ग हिरवागार शालू पांघरतो, आणि याच प्रसन्न वातावरणात अनेक सण आणि उत्सव साजरे केले जातात.

श्रावणातील प्रमुख सण आणि त्यांचे महत्त्व आहे.

**मंगळागौरी व्रत :** श्रावणातील प्रत्येक मंगळवारी नवविवाहित महिला हे व्रत करतात.पतीच्या उदंड आयुष्यासाठी आणि संसाराच्या समृद्धीसाठी शिवा-पार्वतीची पूजा केली जाते. रात्रीच्या वेळी पारंपरिक खेळ (झिम्मा, फुगडी) खेळून संस्कृती आणि भगिनीभाव जपला जातो.

**नागपंचमी:** निसर्गाचा आणि शेतकऱ्यांचा मित्र असलेल्या नागाची पूजा करून कृतज्ञता व्यक्त केली जाते. या दिवशी मातीच्या नागाची किंवा प्रतिमेची पूजा करून दुधाचा नैवेद्य दाखवला जातो.

**नारळी पूर्णिमा:** कोळी बांधवांचा हा प्रमुख सण. समुद्राचे पूजन करून त्याला नारळ अर्पण केला जातो, जेणेकरून जलप्रवासातील संकटे दूर व्हावीत. निसर्गाप्रती आदर दाखवणारा हा एक महत्त्वपूर्ण सण आहे.

**रक्षाबंधन:** भाऊ-बहिणीच्या पवित्र प्रेमाचे प्रतीक असलेला सण श्रावण पौर्णिमेलाच साजरा होतो. बहीण भावाच्या हातावर राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करते, तर भाऊ तिच्या संरक्षणाचे वचन देतो.

**गोकुळाष्टमी (कृष्ण जन्माष्टमी):** श्रावण वद्य अष्टमीला भगवान श्रीकृष्णाचा जन्मदिवस उत्साहाने साजरा केला जातो. दुसऱ्या दिवशी 'दहीहंडी'चा सण तरुणांमध्ये प्रचंड उत्साहात पार पडतो, जो संघटन आणि उत्साहाचे प्रतीक आहे.

**पिठोरी अमावास्या (पोळा):** श्रावणाच्या शेवटच्या दिवशी पिठोरी अमावास्या साजरी केली जाते. याच काळात महाराष्ट्रातील ग्रामीण भागात शेतकरी बांधव शेतात वर्षभर राबणाऱ्या बैलांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'पोळा' हा सण अत्यंत थाटामाटात साजरा करतात.

**सामाजिक व अध्यात्मिक महत्त्व :** निसर्ग संवर्धन आणि सामाजिक एकता: श्रावणातील सण मानवाला निसर्गाच्या निकट आणतात. प्राणी, नद्या आणि वनस्पतींचे पूजन करून निसर्गाचा समतोल राखण्याचा संदेश दिला जातो.

**कौटुंबिक एकत्रिकरण:** सणांच्या निमित्ताने सर्व नातेवाईक आणि कुटुंबीय एकत्र येतात, ज्यामुळे नात्यांमधील आपुलकी आणि प्रेम अधिक घट्ट होते.

**आरोग्यदायी दृष्टीकोन:** श्रावणात पाऊस जास्त असल्याने पचनक्रिया मंदावते. म्हणूनच या महिन्यात एकभुक्त राहणे, उपवास करणे आणि सात्विक आहार घेण्याची परंपरा आहे, जी आरोग्याच्या दृष्टीनेही फायदेशीर ठरते.

# द्वेषाच्या भिंती नव्हे, विचारांच्या खिडक्या उघडू या !

भारतीय समाजजीवनात काही विचारवंत असे होऊन गेले, ज्यांचे शब्द काळाच्या पलीकडे जाऊन पुढील पिढ्यांशी संवाद साधत राहतात. साने गुरुजी हे त्यापैकीच एक. त्यांच्यासाठी देशभक्ती म्हणजे केवळ राष्ट्रगीत म्हणणे नव्हते, धर्म म्हणजे केवळ कर्मकांड नव्हते आणि समाजसेवा म्हणजे केवळ दानधर्म नव्हता. त्यांच्या विचारांच्या केंद्रस्थानी होता.माणूस आणि माणसा माणसांतील प्रेम.'जगाला प्रेम अर्पावे' हा संदेश देणाऱ्या साने गुरुजींच्या लेखणीतून "मानवधर्माची "जी मशाल पेटली, ती आजही तितकीच आवश्यक आहे. विशेषतः समाजात जात, धर्म, भाषा, प्रांत आणि राजकीय विचारांच्या नावाने निर्माण होणाऱ्या दुराव्याच्या काळात साने गुरुजींचे विचार पुन्हा वाचणे ही केवळ साहित्यिक गरज नाही; ती सामाजिक गरज आहे.त्यांच्या 'श्यामची पत्रे' या लेखनातील विचारांमध्ये संकुचित मानसिकतेवर केलेली टीका, स्वतंत्र विचारांची बाजू आणि सर्व धर्मांतील चांगुलपणा स्वीकारण्याचा आग्रह प्रकर्षाने दिसतो. त्यांच्या मते विचारांना भिंती घालून थांबविता येत नाही. ज्ञानाचा प्रकाश कोणत्याही दिशेने आला तरी त्याचे स्वागत केले पाहिजे. बुद्धीला कुलूप लावणारी कोणतीही विचारसरणी धोकादायक साने गुरुजींनी स्वतंत्र विचारशक्तीला अत्यंत महत्त्व दिले. गायत्री मंत्राचा अर्थही त्यांनी बुद्धीला प्रकाश देणारी प्रार्थना म्हणून पाहिला. माणसाने प्रश्न विचारावेत, विविध विचार ऐकावेत, जगातील ज्ञानाचा अभ्यास करावा आणि त्यानंतर स्वतःचा मार्ग निवडावा हा त्यांच्या विचारांचा गाभा होता. तोच बुद्धांचाही विचार होता. आजच्या काळात हा प्रश्न अधिक गंभीर बनतो.

आपल्या मतांशी सहमत असणारेच लोक ऐकायचे आणि विरोधी विचार करणाऱ्यांना शत्रू मानायचे, ही प्रवृत्ती लोकशाहीसाठी घातक आहे. कोणतीही संघटना, कोणताही पक्ष, कोणतीही विचारधारा किंवा कोणताही धार्मिक समूह जर आपल्या अनुयायांना प्रश्न विचारण्यापासून रोखत असेल, तर तेथे विचारांची वाढ होत नाही; तेथे विचारांची बंदिस्ती सुरू होते.

समाजाला अंध अनुयायी नव्हे, तर विवेकी नागरिकांची गरज आहे.धर्माचा अर्थ दुसऱ्याचा द्वेष नाही. साने गुरुजींच्या विचारांचा सर्वांत महत्त्वाचा पैलू म्हणजे धर्मांतर नव्हे, तर मनांतर. एखाद्या धर्मातील काही व्यक्तींनी केलेल्या चुकीसाठी संपूर्ण समाजाला दोषी ठरविणे ही विवेक शून्यता आहे. गुन्हेगाराला शिक्षा झालीच पाहिजे; अत्याचार करणाऱ्याला कायद्याच्या चौकटीत आणलेच पाहिजे. पण गुन्हेगाराची जात किंवा धर्म पाहून संपूर्ण समाजाला दोषी ठरविणे हा न्याय नाही.

गुन्हेगाराला कायद्याने शिक्षा करा; पण संपूर्ण समाजाविषयी द्वेष निर्माण करू नका. ही भूमिका महत्त्वाची आहे. हिंदू समाजात चांगले आणि वाईट दोन्ही प्रकारचे लोक आहेत. मुस्लिम समाजातही चांगले आणि वाईट दोन्ही प्रकारचे लोक आहेत. कोणताही धर्म संपूर्णपणे वाईट किंवा कोणताही समाज संपूर्णपणे दोषरहित असू शकत नाही. माणसाचे मूल्यमापन त्याच्या कर्मावर झाले पाहिजे, जन्मावर नव्हे. द्वेषाचे राजकारण समाजाला कुठे नेणार? द्वेष हा अत्यंत स्वस्त राजकीय माल आहे. तो सहज विकतो. भीती निर्माण केली की गर्दी जमा होते. अफवा पसरवल्या की भावनांना पेटवता येते. इतिहासातील निवडक घटना वारंवार सांगितल्या की वर्तमानातील माणसाविषयी संशय निर्माण करता येतो. पण प्रश्न असा आहे.आपण इतिहासातून शिकणार आहोत की इतिहासाच्या जखमा कुरवाळत बसणार आहोत? भूतकाळातील चुका विसरायच्या नाहीत; पण त्यांचा उपयोग वर्तमानातील वैर वाढविण्यासाठी करायचा की भविष्यात त्या चुका पुन्हा होऊ नयेत यासाठी करायचा, हा निर्णय समाजाने घ्यायला हवा.

साने गुरुजींचा आग्रह हाच होता की, दुसऱ्या धर्मातील चांगले विचार जाणून घ्या. दुसऱ्याची भाषा शिका. दुसऱ्याची संस्कृती समजून घ्या. त्याच्या श्रद्धांचा अभ्यास करा. कारण अपरिचयातून संशय निर्माण होतो आणि संवादातून समज निर्माण होते. आज सोशल मीडियाच्या युगात हा संदेश अधिक महत्त्वाचा आहे. काही सेकंदांत अफवा हजारो लोकांपर्यंत पोहोचते. एखादा व्हिडिओ, एखादा संदेश किंवा एखादा फोटो संपूर्ण समाजाविषयी द्वेष निर्माण करू शकतो. अशा वेळी विवेक, सत्यापन आणि संयम हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे. 'आर्य' होण्याचा अर्थ श्रेष्ठत्व नव्हे, उदारता .साने गुरुजींनी 'आर्य' या संकल्पनेचा अर्थ वंशश्रेष्ठत्व किंवा जातीय अहंकारात शोधला नाही. उलट, त्यांच्या विचारात आर्यत्व म्हणजे उदारता, सदाचार आणि शत्रूप्रतीही माणुसकी राखण्याची वृत्ती अशी व्यापक संकल्पना दिसते. हा विचार आजच्या भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

भारताची ओळख कोणत्याही एका धर्माने, जातीने किंवा भाषेने पूर्ण होत नाही. भारत हा विविधतेतून निर्माण झालेला देश आहे. हजारो वर्षांच्या इतिहासात विविध समाज, संस्कृती, भाषा, परंपरा आणि विचारधारांनी भारतीय जीवनाला समृद्ध केले आहे. म्हणूनच भारताची शक्ती 'सर्वांनी माझ्यासारखे व्हावे' यात नाही; तर 'तू तू राहा, मी मी राहतो; पण आपण माणूस म्हणून एकत्र राहू' या भावनेत आहे. सर्व धर्मांतून चांगले घेण्याची तयारी हवी

साने गुरुजींच्या विचारांचा आणखी एक सुंदर पैलू म्हणजे दुसऱ्या धर्मातील चांगुलपणाकडे पाहण्याची दृष्टी. गीता असो, कुराण असो, बायबल असो किंवा अन्य कोणताही धर्मग्रंथ त्यातील मानवकल्याणाचा संदेश स्वीकारण्यास मन खुले असले पाहिजे.धर्मग्रंथ वाचताना 'माझा धर्म मोठा की तुझा?' हा प्रश्न विचारण्यापेक्षा 'या विचारातून माणूस अधिक चांगला कसा बनेल?' हा प्रश्न विचारला पाहिजे. परोपकार, करुणा, सत्य, संयम, प्रेम, सेवा, न्याय आणि मानवता ही मूल्ये कोणत्याही एका धर्माची मक्तेदारी नाहीत. स्त्रीचा सन्मान ही खरी संस्कृती साने गुरुजींच्या विचारांमध्ये स्त्रियांच्या सन्मानाचा मुद्दाही ठळकपणे येतो. एखाद्या स्त्रीवर अत्याचार करणारा कोणत्याही धर्माचा किंवा जातीचा असो, त्याचा निषेध झालाच पाहिजे. परंतु एखाद्या गुन्हेगाराच्या धर्मावरून संपूर्ण समाजाला दोष देणे हा अन्याय आहे.

आजही महिलांवरील अत्याचार, बालविवाह, हुंडा, लैंगिक हिंसा, कौटुंबिक अत्याचार आणि स्त्रीभेद यांसारखे प्रश्न समाजासमोर आहेत. त्यामुळे साने गुरुजींच्या मानवधर्माचा खरा अर्थ आपण आचरणात आणायचा असेल तर स्त्रीला समान सन्मान आणि सुरक्षितता देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

### गायीबाबतही भावनेपेक्षा विवेक आवश्यक

धार्मिक भावना महत्त्वाच्या आहेत; परंतु त्या भावनांचा उपयोग परस्पर द्वेष निर्माण करण्यासाठी होता कामा नये. साने गुरुजींनी गायीच्या प्रश्नाकडेही ऐतिहासिक आणि सामाजिक संदर्भातून पाहण्याचा प्रयत्न केला. आज या प्रश्नाकडे पाहताना देखील दोन गोष्टी स्पष्ट असल्या पाहिजेत.कायद्याचा आदर आणि परस्परांच्या धार्मिक भावनांचा आदर. कोणत्याही प्राण्याविषयी करुणा असणे ही मानवतेची खूण आहे. परंतु प्राण्याच्या नावावर माणसाचा जीव घेणे, हिंसा करणे किंवा समाजात दंगल निर्माण करणे ही त्या करुणेचीच विटंबना ठरेल.खरा धर्म कोणता?हा प्रश्न आज प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. मंदिरात जाणे, मशिदीत जाणे, चर्चमध्ये प्रार्थना करणे, धार्मिक ग्रंथ वाचणे,ही श्रद्धेची रूपे आहेत. पण त्या श्रद्धेचा परिणाम आपल्या वर्तनात दिसला पाहिजे. आपण भुकेल्या माणसाला अन्न देतो का? आजारी माणसाला मदत करतो का? गरिबाच्या मुलाच्या शिक्षणासाठी उभे राहतो का? स्त्रीचा सन्मान करतो का? कामगाराच्या श्रमाचे मूल्य ओळखतो का? वेगळ्या धर्माच्या शेजाऱ्याशी प्रेमाने वागतो का? विरोधी मताच्या माणसाचा अधिकार मान्य करतो का? जर या प्रश्नांची उत्तरे 'होय' असतील, तर आपली धार्मिकता माणुसकीत उतरली आहे.

### आज साने गुरुजी का हवेत?

आज समाजात माहिती अफाट आहे; पण विवेकाची गरज अधिक आहे. तंत्रज्ञान वेगाने पुढे गेले आहे; पण माणसामाणसांतील अंतर वाढत आहे.राजकीय जागृती वाढली आहे; पण सामाजिक संवाद कमी होत आहे. धार्मिक ओळखी ठळक झाल्या आहेत; पण मानवतेची समान ओळख दुर्बल होऊ नये याची काळजी घ्यावी लागणार आहे.अशा वेळी साने गुरुजींचा संदेश आपल्याला सांगतो,विचारांची दारे बंद करू नका.द्वेषाची भाषा स्वीकारू नका. गुन्हेगाराचा विरोध करा, पण संपूर्ण समाजाचा द्वेष करू नका.

### दुसऱ्याच्या धर्मातील चांगुलपणा जाणून घ्या.

आणि सर्वांत महत्त्वाचे माणसाला माणूस म्हणून पहा. समाजाने कोणत्या दिशेने जावे? आज आपल्या शाळांमध्ये केवळ पाठ्यपुस्तकांचे ज्ञान नको; संविधान, विवेक, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावादी मूल्यांचे शिक्षण आवश्यक आहे. राजकीय नेतृत्वाने मतांसाठी समाजाला विभागण्याऐवजी विकास, रोजगार, शिक्षण, आरोग्य, शेती आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांवर राजकारण केले पाहिजे. आणि सामान्य नागरिकांनी प्रत्येक अफवा पुढे पाठवण्यापूर्वी एक प्रश्न स्वतःला विचारला पाहिजे "यामुळे समाज जोडला जाणार आहे की तुटणार आहे?" शेवटचा विचार...

साने गुरुजींचे विचार केवळ एखाद्या विशिष्ट संघटनेवर किंवा धर्मावर टीका करणारे म्हणून पाहणे म्हणजे त्यांच्या व्यापक मानवतावादी भूमिकेला मर्यादित करणे होय. त्यांच्या लेखणीचा मूलस्वर होता.मनुष्यद्वेषाचा निषेध आणि मानवतेचा स्वीकार.आज भारताला भिंती उभारणाऱ्या हातांपेक्षा खिडक्या उघडणारे हात अधिक आवश्यक आहेत.

आज आपल्याला एकमेकांविरुद्ध उभे करणाऱ्या घोषणांपेक्षा एकमेकांना समजून घेणारे संवाद अधिक आवश्यक आहेत. धर्माच्या नावाने माणूस मोठा होत नाही; माणुसकीने माणूस मोठा होतो. म्हणूनच आजच्या अस्वस्थ काळात साने गुरुजींचा एक मूलभूत संदेश पुन्हा स्मरूया "विचारांच्या सर्व खिडक्या खुल्या ठेवा; ज्ञानाचा प्रकाश कोणत्याही दिशेने येऊ द्या... आणि शेवटी प्रत्येक विचाराची कसोटी एकच तो माणसाला माणसाच्या जवळ आणतो की दूर नेतो?" हेच महत्त्वाचे आहे. खरा तो एकची धर्म!!

जगाला प्रेम अर्पावे!!!

**गजानन ओंकार हरणे,**
समाजसेवक, खडकी अकोला.
संवाद:-9822942623.

# सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये तुफान हाणामारी

## नगरसेवकासह काही जण जखमी, सभागृहाचा वाद रस्त्यावर



जखमी



प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**हिवरखेड :** महाराष्ट्रात आणि केंद्र सरकार मध्ये भाजप आणि शिंदे सेना सत्तेत खांद्याला खांदा लावून गुण्या गोविंद्याने नांदत असताना हिवरखेड नगर परिषद मध्ये वेगळेच चित्र पहायला मिळाले. येथील नगर परिषदेच्या मासिक सभेत व्हिडिओ शूटिंग काढण्यावरून वादाची ठिणगी पडली आणि त्याचे पडसाद नगरपरिषद समोरच मारामारीत झाले. यावेळी शेकडो जण जमा झाले होते. मारहाणी मध्ये शिंदे सेनेचा नगरसेवक ऋषिकेश पंचबुद्धे आणि दोन्ही गटातील काही जण जखमी झाले पोलिसांनी मेडिकल करिता पाठविले.

विशेष म्हणजे हा सर्व प्रकार पोलीस आणि होमगार्ड जवानांच्या उपस्थितीत घडला असून पोलिसांना ही मारहाण रोखता आली नाही की त्यांनी रोखली नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे. याप्रकरणी अद्याप पर्यंत पोलिस स्टेशनला कोणत्याही गुन्ह्याची नोंद झाली नसल्याची माहिती ठाणेदार सचिन पाटील यांनी दिली.

हिवरखेड नगर परिषद मध्ये भाजपची एक हाती सत्ता असून दादागिरी करून जनतेचा आणि विरोधकांचा आवाज दाबल्या जात आहे. आम्ही जनतेच्या विकासासाठी सभेत विचारलेल्या प्रश्नांमुळे शिंदे सेनेचे नगरसेवक ऋषिकेश पंचबुद्धे यांना रॉडने जोरदार मारहाण करण्यात आली. त्यात ते जखमी झाले आणि माझ्या पाठीवर सुद्धा मार लागला असे शिंदे सेना गटनेते रवी राणा घुंगड म्हणाले.

दुसरीकडे भाजपचे बांधकाम सभापती अजित खा जमीर खान यांना सुद्धा मारहाण करण्यात आली. नगराध्यक्ष सौ .सुलभा दुतोंडे यांचे भाचे विशाल कुलट यांचा हात तुटला असून डोक्याला व पोटाला धारदार शस्त्राने मारहाण करण्यात आली. दोघांचेही मेडिकल करण्यात आले, अशी प्राथमिक माहिती माजी सरपंच संदीप इंगळे यांनी दिली.

मुख्याधिकारी वेगळेच सांगतात..

मासिक सभा शांततेत पार पडल्याची प्रतिक्रिया मुख्याधिकारी यांनी दिली. या मागे नेमके काय कारण आहे असा सवाल सुज्ञ नागरिकांनी केला? ज्यांचा वाद झाला ते दोन्ही पक्षाचे पदाधिकारी यांनी पोलिसात धाव घेतली, परंतु मिस्टर इंडिया नेहमी राहणारे प्रभारी मुख्याधिकारी प्रत्यक्ष हजर होते. व एवढा मोठा राडा झाल्यावरही काहीच झाले नाही असे का म्हणतात ? ही बाब भंडावून सोडत आहे.



मी सभेची अध्यक्ष असताना माझी परवानगी न घेता ऋषिकेश पंचबुद्धे यांनी जाणीवपूर्वक व्हिडिओ शूटिंग काढली मी मनाई केल्यावरही व्हिडीओ सुरूच ठेवल्याने वाद झाला. थोड्या वेळाने सभा पूर्ववत सुरु झाली. नगरपरिषदेसमोर हाणामारीचा कोणता प्रकार झाला याबाबत मला माहिती नाही असे नगराध्यक्ष सौ. सुलभा रमेश दुतोंडे म्हणाल्या.

# "नगरसेवकांच्या नातेवाईकांना नगरपरिषदेत 'नो एंट्री'; हस्तक्षेप करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा"

वि. प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**अकोट :** अकोट नगरपरिषदेच्या प्रशासकीय कामकाजात काही नगरसेवक व नगरसेविकांच्या नातेवाईकांकडून होत असलेल्या कथित हस्तक्षेपावर अखेर नगरपरिषद प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. नगरपरिषद मुख्यालय तसेच विविध विकासकामांच्या ठिकाणी नगरसेवकांचे पती, पत्नी, भाऊ, वडील, मुले आदी नातेवाईकांकडून होणाऱ्या वावर आणि हस्तक्षेपास प्रतिबंध घालण्यासाठी मुख्याधिकारी शशिकांत मारोती बाबर यांनी विशेष कार्यालयीन परिपत्रक जारी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाच्या 20 जुलै 1993 च्या शासन परिपत्रकाचा आधार घेत काढण्यात आलेल्या या आदेशामुळे अकोट नगरपरिषदेत एकच खळबळ उडाली आहे. परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे की, नगरपरिषदेच्या कामकाजात सहभागी होण्याचा आणि प्रशासकीय निर्णय प्रक्रियेत मत मांडण्याचा कायदेशीर अधिकार केवळ निवडून आलेल्या अधिकृत नगरसेवक व नगरसेविकांनाच आहे. त्यांच्या नातेवाईकांना कोणताही अधिकृत अधिकार नसताना काहीजण नगरसेवक असल्याचा आव आणत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे.

परिपत्रकानुसार काही नातेवाईक सोशल मीडियावर स्वतःचा उल्लेख नगरसेवक म्हणून करत आहेत, अधिकारी-कर्मचाऱ्यांना नगरसेवक असल्याचे सांगून फोन करत आहेत, कार्यालयांना भेटी देत आहेत तसेच विविध कामांमध्ये हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा प्रकारांना नगरपरिषदेच्या प्रतिमेला धक्का पोहोचविणारे आणि कारवाईस पात्र असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

मुख्याधिकारी बाबर यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले आहेत की, नगरसेवक आणि नगरसेविकांना योग्य सन्मान द्यावा; मात्र त्यांच्या नातेवाईकांच्या कोणत्याही सूचनांचे पालन करू नये. तसेच दबावाखाली येऊन नियमबाह्य किंवा कायद्याला धरून नसलेली कामे करू नयेत. नातेवाईक नागरिक म्हणून कार्यालयात आल्यास त्यांची कामे मात्र नियमानुसार करण्यात यावीत, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, सर्व नगरसेवक व नगरसेविकांना आपल्या नातेवाईकांना हे परिपत्रक समजावून सांगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांचे परिपत्रक**

**काय आहेत प्रमुख निर्देश?**

- नगरपरिषदेच्या कामकाजात केवळ निवडून आलेल्या नगरसेवकांनाच अधिकार.
- नातेवाईकांच्या हस्तक्षेपास स्पष्ट मनाई.
- अधिकारी-कर्मचाऱ्यांनी नातेवाईकांचे आदेश पाळू नयेत.
- दबावाखाली येऊन नियमबाह्य कामे करू नयेत.
- नातेवाईक नागरिक म्हणून आल्यास नियमानुसार सेवा द्यावी.
- कार्यालयीन शिस्तभंग करणाऱ्यांविरुद्ध कारवाईचा इशारा.




# जटेश्वर शिवभक्त मंडळाच्या 18 क्रमांकाच्या पालखीचा सुवर्ण महोत्सव

## मोठ्या उमरीत प्रथमच कालीपुत्र कालीचरण महाराजांच्या हस्ते भव्य महाआरती

प्रतिनिधी २८ ऑगस्ट



**अकोला :** मोठ्या उमरीतील जटेश्वर शिवभक्त मंडळ पालखी क्रमांक १८ च्या वतीने गेल्या ५० वर्षांपासून श्रावण महिन्यात सातत्याने भव्य पालखी व कावड महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. गांधीग्राम येथून पवित्र जल आणून श्री राजराजेश्वर महाराजांना अभिषेक करण्याची परंपरा जपणाऱ्या मंडळाचा वतीने यंदा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यात येत आहे . या निमित्ताने रविवार, ६ सप्टेंबर रोजी विविध धार्मिक व भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सुवर्ण महोत्सवानिमित्त सकाळी ९ वाजता भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. गुडधी रेल्वे गेट परिसरातील मधुवत्सल गोसेवा प्रतिष्ठान येथून शोभायात्रेला प्रारंभ होऊन ती मोठ्या उमरीतील आसोलकर वाडी येथील जटेश्वर शिवभक्त मंडळाच्या कार्यक्रमस्थळी पोहोचेल. तेथे भक्तिभावात शोभायात्रेचा समारोप करण्यात येणार आहे.

यानंतर दुपारी ४ वाजता अकोल्या शहरातील सुप्रसिद्ध राष्ट्रीय भजनकार गोपाल शर्मा हारे, अकोला यांच्या भक्तिगीत व शिवभजनांचा संगीतमय भजनसंध्येचा कार्यक्रम होणार आहे. सायंकाळी ७ वाजता महाआरतीचा मुख्य कार्यक्रम होणार असून, शिवतांडव स्तोत्रामुळे राष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध झालेले कालीपुत्र कालीचरणजी महाराज यांच्या हस्ते भव्य महाआरती करण्यात येणार आहे. यावेळी कालीचरण महाराज उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करणार आहेत. जटेश्वर शिवभक्त मंडळाच्या माध्यमातून प्रथमच कालीचरण महाराजांचे मोठ्या उमरीत आगमन होत असल्याने या सोहळ्याबाबत भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. कार्यक्रमाची जय्यत तयारी मंडळाच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. रविवारी रात्री पूजा-विधी आटोपल्यानंतर मंडळाची पालखी क्रमांक १८ गांधीग्रामकडे प्रस्थान करणार असून, सोमवारी अंतिम श्रावण सोमवारनिमित्त आयोजित कावड पालखी महोत्सवात सहभागी होऊन श्री राजराजेश्वर महाराजांना पवित्र जलाचा अभिषेक करण्यात येणार आहे. अंतिम श्रावण सोमवारच्या पूर्वसंध्येला होणारा हा अभूतपूर्व सोहळा पाहण्यासाठी पंचक्रोशीतील विविध गावांमधून महिला-पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या ऐतिहासिक शोभायात्रा व महाआरती सोहळ्यात महिला-पुरुष भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष आराध्य आसोलकर, अनिल शिंदे, प्रमोद जयपिल्ले, उपाध्यक्ष आदित्य कापसे, रामेश्वर आसोलकर, सचिव अमरदीप आसोलकर, कोषाध्यक्ष अंबादास तायडे, सहकोषाध्यक्ष गजानन आसोलकर आदींनी केले आहे.

**पन्नास वर्षांची अखंड परंपरा**

जटेश्वर शिवभक्त मंडळाची मुहूर्तमेढ पन्नास वर्षांपूर्वी दत्तात्रय मसने, स्व. शिवाजी आसोलकर, स्व. रघुनाथ आसोलकर, स्व. हरिदास तायडे आदींनी रोवली. त्यानंतर ईश्वर आसोलकर, अशोक घाटोळ, हिरालाल गिरी, मोहन भालेराव, इंद्रभान शेगोकार, रॉबर्ट शिकवेरा, पांडुरंग काटकर, रवी बेलसरे, अरुण आसोलकर, संतोष बेलसरे, पुंडलिक मसने, देवधर पेटकर, रमेश आसोलकर, भीमा पाटील, महादेव कापसे, गोपाल आसोलकर, गजानन बेलसरे, अजय शेगोकार, दिनकर आसोलकर, शंकर आसोलकर, पुरुषोत्तम आसोलकर, बंडू आसोलकर, नरेंद्र आसोलकर यांच्यासह निलेश, मंगेश, आशिष, हेमंत, शरद, गजानन, योगेश, प्रशांत घाटोळ, संदीप घाटोळ, अजय, अतुल, श्रीकांत, ओम, प्रफुल, जय, सूरज, रामेश्वर, अमरदीप, सोपान, जयेश, अतुल म्हसणे, धनोकार, हरीश आसोलकर व धीरज तांगडे आदींनी मंडळाच्या कार्याला चालना दिली. गेल्या पाच दशकांपासून अखंडपणे पालखी महोत्सवाची परंपरा सुरू असल्याची माहिती मंडळाचे मार्गदर्शक ह.भ.प. तुलसीदास महाराज मसने यांनी दिली.

# कस्तुरीच्या शिबिरात 45 जणांचे रक्तदान



प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**अकोला :** ' कस्तुरी' संस्थेने सामाजिक बांधिलकी जपत स्थानिक डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या सहकार्याने २६ ऑगस्ट रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. एकूण ४५ दात्यांनी रक्तदान करत सामाजिक बांधिलकीचा परिचय दिला..

या शिबिराचे उद्घाटन संत साहित्याचे गाढे अभ्यासक प्राचार्य डॉ. शांताराम बुटे यांनी केले. कस्तुरीचे ज्येष्ठ स्नेही देवीकिसनजी भट्टड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उद्घाटन समारंभासाठी व्यासपीठावर माजी आमदार वसंतराव खोटरे व ज्येष्ठ पत्रकार सिद्धार्थ शर्मा व कस्तुरीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.ॲड.किशोर बुटोले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन सचिव संजय ठाकरे यांनी केले. कार्यकारिणी सदस्य संजय गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. किशोर बुटोले यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त कस्तुरीच्या वतीने शाल, श्रीफळ , वस्त्र व मानपत्र देऊन सपत्निक सत्कार करण्यात आला. ह.भ.प.सौ.संगीता जोध यांनी मानपत्र वाचन केले. रक्तदान करणाऱ्यांना डॉ. हेडगेवार रक्तपेढीतर्फे रक्तदान प्रमाणपत्र व कस्तुरीतर्फे प्रशस्तीपत्र , देववस्त्र व रोप देऊन सन्मानित करण्यात आले. प्राचार्य डॉ. शांताराम बुटे यांनी रुग्णांसाठी रक्त ही केवळ वैद्यकीय गरज नसून जीवनाची आशा आहे. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रकल्प प्रमुख श्रीमती अनिता इधोळ यांचे नेतृत्वात डॉ.हेडगेवार रक्तपेढीचे व्यवस्थापक रमेश देशपांडे, डॉ.पांडे व चमू कस्तुरीचे संजय गायकवाड, संजय ठाकरे, अमर शर्मा , संजय बुटोले, सतीश बिटोडकर, दामोदर नुपे,वसंतराव देशमुख, राजेश्वर पेठकर , सौ.मीरा देशपांडे , चेतना आनंदानी, ज्योती सुलताने , प्रा. प्रभाकर पाटील, सौ. मिरा वानखडे, रविंद्र वानखडे कमल राठोड यांनी परिश्रम घेतले. कस्तुरीच्या सेवाकार्याने प्रभावित होऊन कमल पन्नालाल मिश्रा यांनी आजीवन सभासदत्व स्वीकारले. त्यांचा प्रा. किशोर बुटोले , माजी आमदार वसंतराव खोटरे यांनी शाल, रोप व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. सतीश बिटोडकर यांनी त्यांच्या पत्नी स्व.सौ.स्मिता बिटोडकर यांच्या स्मरणार्थ ३०० रोपे वाटप करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

# कुरुम येथे दुकानदारावर दबाव आणण्याचा आरोप

**मूर्तिजापूर :** कुरूम येथे स्वस्त धान्य दुकानदारांकडे दोन पोर्टलशी संबंधित युवक गेले असता त्यांच्यात वाद झाल पोर्टल छाप यांनी दुकानदारांवर दबाव आणण्याचा किंवा ब्लॅकमेलिंग करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले असून, संबंधित युवकांना दुकानदारांनी मारहाण केल्याचा आरोप आहे. ही घटना शनिवार, २२ ऑगस्ट रोजी घडल्याचे सांगण्यात येत असून, त्यानंतर हे प्रकरण माना पोलीस ठाण्यात पोहोचले. पोलिसांनी संबंधित पक्षांना बोलावून तब्बल तीन ते चार तास या प्रकरणाबाबत चर्चा केल्याची माहिती आहे. दोन्ही बाजूंकडून तक्रार देण्याची तयारी दर्शविण्यात आली असली तरी, अद्याप गुन्हा दाखल झालेला नसल्याचे समजते. दरम्यान, पोर्टल किंवा सोशल मीडिया पत्रकारितेच्या नावाखाली धमकी, दबाव अथवा पैशांची मागणी झाल्यास संबंधितांनी पोलिसांकडे तक्रार करावी, अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. नेमका वाद कशामुळे झाला, संबंधित युवक दुकानदारांकडे कोणत्या कारणासाठी गेले होते आणि ब्लॅकमेलिंगचा प्रयत्न झाला होता का, याचा खुलासा माना पोलिसांच्या चौकशीनंतरच होण्याची शक्यता आहे.


## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

प्रोसेस क. ३३९०/2026 एम.जे.सी. क. २३५/२०२६

दिनांक २५/08/2026 चौकशी तारीख - ०५/१०/२०२६

**अर्जदार** - राजु किसन गवई, वय ५१ वर्ष, रा. अडगावं खुर्द, ता. अकोट जि. अकोला

**विरूध्द**

**गैरअर्जदार :-** कोणीही नाही

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हे वरील पत्यावरील कायम रहिवासी असून अर्जदाराचे वडील नामे किसनराव रंगाजी गवई हे आपले संपूर्ण जिवनकाळात अडगाव खुर्द ता. अकोट जि. अकोला येथेच राहले व तेथेच दि. २६/१०/२०२४ रोजी मयत झाले आहेत. तसेच मयत किसनराव रंगाजी गवई यांची पत्नी व अर्जदाराची आई नामे सुर्यकांता किसन गवई ह्या दि. २८/०७/२०२६ रोजी पिलकवाडी, ता. अकोट जि. अकोला येथे भावाचे घरी मयत झाल्या आहेत. तसेच मयत सुर्यकांता किसन गवई यांना अर्जदारांव्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानूसार निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २५/०८/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट


# सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेत 17 वर्ष गटात क्रीडा प्रबोधिनी संघ विजयी

प्रतिनिधी २८ ऑगस्ट



**अकोला :** अकोला जिल्हा क्रीडा परिषद अंतर्गत राज्यस्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेचे आयोजन दि. 24 ते 27 ऑगस्ट 2026 या कालावधीत जसनागरा पब्लिक स्कूल, रिधोरा ता. बाळापूर जि. अकोला येथे घेण्यात आली. 17 वर्ष वयोगटात जिल्हा क्रीडा प्रबोधिनी संघ विजयी झाला.

सकाळच्या सत्रात पहिला उपान्त्य सामना छत्रपती संभाजीनगर vs मुंबई संघात होऊन यामध्ये मुंबई संघाने छ. संभाजीनगर संघाला 2- 0 ने हरवीत अंतिम फेरी गाठली.तर दुसरा उपान्त्य सामना पुणे vs क्रीडा प्रबोधिनी या संघात झाला हा सामना अतिशय अटीतटीत होऊन अंतिम क्षणात क्रीडा प्रबोधिनी संघाने 1 गोल करीत अंतिम फेरी गाठली. 17वर्ष मुलांच्या गटात क्रीडा प्रबोधिनी संघाने मुंबई संघाला 3 - 1 ने नमवीत विजेता पदाला गवसनी घालून राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरला.उपविजयी मुंबई संघ राहिला तर तृतीय स्थानावर पुणे संघ राहिला.

स्पर्धेत पंच म्हणून रोशन पांडे, केजल वंजारी, सलीम खान, तुषार ठोमरे, विनय सिडाम, शरद शिर्के, मोईन खान, शोएब खान जुनेद खान, शाहिद खान यांनी केले. तर ऑफिसिअल म्हणून क्रीडा मार्गदर्शक जीवन मोहोड, सईद खान, नईम खान यांनी काम पहिले.


## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

प्रोसेस क. ३३९१/2026 एम.जे.सी. क. २३४/२०२६

दिनांक २५/08/2026 चौकशी तारीख - ०६/१०/२०२६

**अर्जदार** - १. श्रीमती नलिनी मधुकर भुस्कट, वय ६५ वर्ष, २. संदिप मधुकरराव भुस्कट, वय ४५ वर्ष, ३. सौ. वृषाली सुभाष पवार, वय ४६ वर्ष, १ ते ३ रा. शिवाजी कॉलेज रोड संभाजी नगर, अकोट ता. अकोट जि. अकोला ४. सौ. दिपाली अर्पण कोठेकर, वय ४३ वर्ष, रा.वार्ड क.११, मालीपुरा, चांदुर रेल्वे, ता. चांदुर रेल्वे, जि. अमरावती.

**विरूध्द**

गैरअर्जदार :- कोणीही नाही

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हे वरील पत्यावरील कायम रहिवासी असून अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ चे वडील नामे मधुकर बळीराम भुस्कट हे आपले संपुर्ण जिवनकाळात कॉलेज रोड संभाजी नगर अकोट ता. अकोट जि. अकोला येथेच राहले व तेथेच दि. ०१/१०/२०२२ रोजी मयत झाले आहेत. तसेच मयत मधुकर बळीराम भुस्कट यांची आई नामे कौसल्याबाई बळीरामजी भुस्कट ह्या दि. ३१/०१/२०१७ रोजी अकोट ता. अकोट जि. अकोला येथे मयत झाल्या आहेत. तसेच मयत मधुकर बळीराम भुस्कट यांना अर्जदार क. १ ते ४ यांचेव्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानुसार निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २१/०८/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट


# युवकांना रोजगार द्या, रिक्त पदे भरा; राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

प्रतिनिधी २८ ऑगस्ट




**अकोला :** सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासोबतच शासकीय व निमशासकीय विभागांतील रिक्त पदांवर तातडीने भरती करण्यात यावी, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार यांच्या वतीने महाराष्ट्रात पाच ठिकाणी आंदोलन करण्यात आले. यावेळी संबंधित प्रशासनाला निवेदने सादर करण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार आणि प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या निर्देशानुसार हे आंदोलन करण्यात आले. राज्यातील विविध भागांत पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बेरोजगार युवकांच्या प्रश्नांवर आवाज उठवत सरकारचे लक्ष वेधले.

अकोल्यात प्रदेश उपाध्यक्ष श्याम अवस्थी, निरीक्षक गणेश राय, प्रदेश संघटक सचिव जावेद जकरिया, महानगर अध्यक्ष रफीक सिद्दीकी आणि कार्याध्यक्ष देवानंद ताले यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी युवा अध्यक्ष देवानंद राऊत आणि अकोला पश्चिम अध्यक्ष फिरोज खान हसन खान यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात सुशिक्षित बेरोजगार युवकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. प्रत्येक एमआयडीसी क्षेत्रात स्थानिक बेरोजगार युवकांची रोजगार विनिमय केंद्रामार्फत नोंदणी करून स्थानिक भूमिपुत्रांना त्यांच्या पात्रतेनुसार रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हास्तरावर ठोस कृती आराखडा तयार करावा, अशी मागणी करण्यात आली.

औद्योगिक संघटना तसेच विविध कंपन्यांशी समन्वय साधून स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

तसेच परीक्षांमधील पेपरफुटी व गैरप्रकारांना आळा घालून दोषींवर कठोर कारवाई करावी, सर्व विभागांतील रिक्त शासकीय पदांची नियमित व वेळेत भरती करावी, विविध आरक्षणांमधील प्रलंबित अनुशेष तातडीने भरावा, कंत्राटी पद्धतीऐवजी पात्र युवकांना नियमित शासकीय सेवेत संधी द्यावी आणि पोलीस दलातील रिक्त पदांची भरती तातडीने करावी, अशा विविध मागण्या करण्यात आल्या.

भरती प्रक्रियेत होणाऱ्या अनावश्यक विलंबामुळे अनेक उमेदवारांची वयोमर्यादा संपते. त्यामुळे भरती प्रक्रिया वेळेत पूर्ण करून युवकांना संधी देण्यात यावी, तसेच बेरोजगार युवकांसाठी जिल्हानिहाय रोजगारनिर्मितीचा ठोस कार्यक्रम जाहीर करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी महानगर अध्यक्ष रफीक सिद्दीकी, प्रदेश संघटक सचिव जावेद जकरिया, युवा अध्यक्ष देवानंद राऊत, अकोला पश्चिम अध्यक्ष फिरोज खान हसन खान, शरद खंडेराव, शरद सरप, सुमित चोपडे, हुसेन खान, नितेश बोराखडे, याया पठाण, रुबिन मोहदजम, कार्तिक देशमुख, मोहम्मद फारूक आणि अब्दुल शकील यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आत्मनिर्भर भारताचा पाया व्यसनमुक्त युवकच

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**अकोला :** देशाला आत्मनिर्भर बनवायचे असेल तर देशाचा युवक हा शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सुदृढ असला पाहिजे. आणि त्यासाठी तो व्यसनमुक्त असणे ही काळाची गरज आहे, असे परखड प्रतिपादन राष्ट्र सेवा दल, पुणे चे ज्येष्ठ कार्यकर्ते दत्ता पाकिरे यांनी केले. सामाजिक न्याय विभाग, समाजकल्याण विभाग जि. प. अकोला, नशाबंदी मंडळ व श्री शिवाजी विद्यालय, शहर शाखा, अकोलाच्या वतीने 'व्यसनमुक्त भारत अभियान' अंतर्गत संकल्प सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. ज्येष्ठ सर्वोदयी श्रीकृष्ण विखे पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# भीषण अपघातात एक जण ठार, चार गंभीर जखमी

प्रतिनिधी २८ ऑगस्ट



**यवतमाळ** : अजमेरला दर्शनासाठी निघालेल्या भाविकांवर वाटेतच काळाने घाला घातला. पातूर-अकोला मार्गावर चालकाचा ताबा सुटल्याने भरधाव स्विफ्ट डिझायर कार डिव्हायडरवर आदळून झालेल्या भीषण अपघात झाला. यामध्ये एकाचा जागीच मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झाले. हा थरारक अपघात महामार्गावरील एका सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

अदनान खान रफिक खान (वय २५) रि. ढाणकी असे मृत तरुणाचे नाव आहे. तर सय्यद बाबू, सय्यद अक्रम, सय्यद तोहिद, चालक फरान शेख हे चार जण गंभीर जखमी झाले आहे.

उमरखेड, ढाणकी परिसरातील हे भाविक कारने अजमेरच्या दिशेने जात होते. पातूर-अकोला मार्गावरून प्रवास सुरू असताना, चालकाला झोपेची डुलकी आल्याने कारवरील नियंत्रण सुटले व भरधाव कार थेट दुभाजकाला (डिव्हायडर) जाऊन धडकली. धडक इतकी जोरदार होती की, कारचा पुढील भाग पूर्णपणे चक्काचूर झाला.

स्थानिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन जखमींना कारमधून बाहेर काढले. मात्र, अदनान खान यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला होता. उर्वरित चार जखमींवर प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी नांदेड येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

या अपघाताचे भयानक दृश्य महामार्गावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्ट दिसत असून, फुटेजमध्ये भरधाव कार नियंत्रण सुटून थेट डिव्हायडरवर आदळताना स्पष्ट दिसत आहे. या दुर्घटनेची माहिती ढाणकी, उमरखेड परिसरात पोहोचताच सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी घटनेची नोंद घेतली असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पुढील तपास सुरू आहे.

## उमरखेड शहर काँग्रेसच्या महिला अध्यक्षपदी सागर शिंदे



प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**उमर खेड** : उमरखेड शहर काँग्रेसच्या महिला अध्यक्षपदी सागर शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा संध्या सव्वालाखे यांच्या मान्यतेने आणि यवतमाळ जिल्हा महिला काँग्रेस अध्यक्षा वंदना आवारी यांच्या नेतृत्वाखाली ही निवड करण्यात आली. दीर्घकाळापासून सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेल्या सागर शिंदे यांच्या निवडीमुळे उमरखेड शहरातील महिला संघटकांना नवी दिशा मिळणार आहे. आगामी काळात पक्षाची ध्येयधोरणे आणि विचारप्रणाली तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचवणे, तसेच महिलांच्या विविध सामाजिक प्रश्नांना वाचा फोडत पक्षसंघटन बळकट करण्याचे महत्त्वाचे आव्हान त्यांच्यासमोर असणार आहे.

# विद्यार्थिनींचे फोटो मॉर्फ करून सोशल मिडीयावर बदनामी

### आरोपी अहमदाबादमधून गजाआड

### यवतमाळ शहर पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**अहमदाबादमध्ये सापळा रचून**

■ आरोपीच्या लोकेशनचा तांत्रिक शोध घेऊन यवतमाळ शहर पोलिसांचे विशेष पथक गुजरातला रवाना करण्यात आले. अहमदाबाद येथील रखियाल परिसरातून आरोपी फरहान अली याला २५ ऑगस्ट २०२६ रोजी ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. न्यायालयाने आरोपीला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून, कोठडीची मुदत संपल्यानंतर त्याची न्यायालयीन कोठडीत (कारागृहात) रवानगी करण्यात आली आहे.

**यवतमाळ** : महाविद्यालयातील विद्यार्थिनींचे फोटो मॉर्फ करून इंस्टाग्रामवर बनावट (फेक) अकाऊंटद्वारे अश्लील मजकूर प्रसिद्ध करणाऱ्या २४ वर्षीय संशयिताला यवतमाळ शहर पोलिसांनी गुजरात राज्यातील अहमदाबाद येथून बेड्या ठोकल्या आहे.



फरहान अली सुभान अली (वय २४, रा. शाहपूर, जि. रामपूर, उत्तर प्रदेश) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

यवतमाळ शहरातील एका महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थिनीने ११ जुलै २०२६ रोजी यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. इंस्टाग्राम आयडीवरून तक्रारदार विद्यार्थिनी व तिच्या मित्र-मैत्रिणींचे फोटो मॉर्फ करून अश्लील शब्दांसह सार्वजनिक प्लॅटफॉर्मवर अपलोड करण्यात आले होते. यामुळे महाविद्यालयात बदनामी झाल्याचे तक्रारीत नमूद होते.

या तक्रारीवरून यवतमाळ शहर पोलिसांत अप. क्र. ५९१/२०२६ कलम २९६, ७९, ३५६ (२) बीएनएस (BNS) सहकलम ६६ (C), ६७, ६७ (A) आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

विद्यार्थ्यांच्या बदनामीशी संबंधित अत्यंत संवेदनशील गुन्हा असल्याने पोलीस निरीक्षक निलेश सुरडकर यांनी स्वतः या गुन्ह्याचा तपास हाती घेतला. तपासादरम्यान इंस्टाग्रामकडून मिळालेल्या तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी फरहान अली याचे नाव निष्पन्न झाले. गुन्हा दाखल झाल्याची माहिती मिळताच आरोपीने स्वतःचा मोबाईल बंद केला. उत्तर प्रदेशातील मूळ गाव सोडून तो गुजरातमध्ये पसार झाला.

**कारवाई करणारे पथक**

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली यवतमाळ शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार पोलीस निरीक्षक निलेश सुरडकर, पोलीस उपनिरीक्षक निलेशकुमार मिश्रा, पोलीस अंमलदार भरत राठोड, रवींद्र नेवारे, अंकुश फेंडर यांनी केली.

## उमरखेड तालुका व शहर युवासेनेची नवी कार्यकारिणी जाहीर



प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**उमरखेड** : शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे आणि सचिव वरुण सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली उमरखेड तालुका व शहर युवासेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.

युवासेना जिल्हाप्रमुख विशाल पांडे, शिवसेना उपजिल्हा संघटक राजू खामनेकर, शहर प्रमुख संदीप ठाकरे, जिल्हा समन्वयक संजय पळसकर आणि तालुकाप्रमुख संभाजी गोरटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांची नावे घोषित करण्यात आली.

■ **नवनियुक्त पदाधिकारी**

अमोल बळीराम राठोड – युवासेना तालुका प्रमुख. राहुल संतोष जाधव – तालुका समन्वयक. दिलीप जाधव – तालुका संघटक. हिटलर राठोड – सोशल मीडिया तालुकाप्रमुख. निलेश जळके – तालुका सचिव. प्रफुल गोरटकर – ढाणकी शहर प्रमुख. लक्ष्मण शिरडकर – शहर संघटक. अशोक जटाळे, सचिन राठोड, रमेश चिंचोलकर – उप-तालुका प्रमुख. नवनिर्वाचित सर्व पदाधिकाऱ्यांचे पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडून अभिनंदन करण्यात आले असून पुढील संघटनावृद्धीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# रेतीची वाहतूक करणारा 'डुग्गा' जप्त, चालकावर गुन्हा दाखल

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**उमरखेड** : जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत अवैध रेतीची वाहतूक करणारा डुग्गा (टिपर) जप्त केला आहे. या कारवाईत एका चालकावर उमरखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२६ ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक ईद-ए-मिलाद बंदोबस्त आणि गस्तीवर असताना उमरखेड ते ढाणकी रोडने विना-रॉयल्टी अवैध पिवळ्या रेतीची चोरटी वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळाली. त्यावरून पथकाने हरदडा फाटा रोडवर सापळा रचून एम.एच. ०४ इ.एल. ५७५३ क्रमांकाचा डुग्गा रोखला.

या कारवाईत ४ लाख ५ हजार रुपये किमतीचा डुग्गा आणि त्यातील पिवळी रेती जप्त करण्यात आली.



■ सदर कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि एलसीबी प्रमुख सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धीरज बांडे, पोलीस उपनिरीक्षक अमोल राठोड व त्यांच्या पथकाने पार पाडली.

याप्रकरणी चालक सय्यद शाहीद सय्यद वहीद (वय २०, रा. ढाणकी, ता. उमरखेड) याला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०३(२) आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४८(८) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## सागवान झाडांच्या पंचनाम्यासाठी टाळाटाळ

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**खडका येथील शेतकऱ्याचा मुख्य वनसंरक्षकांकडे तक्रार अर्ज**

**महागाव** : सागवान लाकूड कटाईच्या पंचनामा अहवालासाठी टाळाटाळ करून मानसिक त्रास देणाऱ्या क्षेत्र सहाय्यकाविरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी, अशी तक्रार महागाव तालुक्यातील खडका येथील शेतकरी चरणदास परशराम राठोड यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी २४ ऑगस्ट रोजी यवतमाळचे मुख्य वनसंरक्षक यांच्याकडे लेखी अर्ज सादर करून चौकशीची मागणी केली आहे.

राठोड यांच्या मालकीच्या शेतातील सागवान झाडांची वाहतूक व कटाई करण्यासाठी आवश्यक ती वन विभागाची प्राथमिक परवानगी घेण्यात आली होती. त्यानंतर प्रत्यक्ष लाकूड कटाईसाठी त्यांनी १२ ऑगस्ट २०२६ रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाकडे नियमानुसार अर्ज दाखल केला. वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी तत्काळ संबंधित क्षेत्र सहाय्यक प्रमोद लांडगे यांना घटनास्थळी जाऊन पाहणी व पंचनामा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते.

मात्र, क्षेत्र सहाय्यक लांडगे यांच्याशी वारंवार संपर्क साधूनही ते "आज येतो, उद्या येतो" असे सांगून टाळाटाळ करत असल्याचा आरोप राठोड यांनी केला आहे. अखेर २० ऑगस्ट रोजी वन विभागाची इतर कामे असल्याचे सांगत पंचनामा करण्यास त्यांनी थेट नकार दिला. गेल्या १२ दिवसांपासून लाकूड कटाई खोळंबल्याने मोठी आर्थिक अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्याची तात्काळ चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, मानसिक त्रासाबाबत कारवाई करावी आणि कटाईची परवानगी तात्काळ देण्यात यावी, अशी मागणी राठोड यांनी केली आहे.

# पोफाळीत ईद-ए-मिलादनिमित्त अन्नदान



प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**पुसद** : ईद-ए-मिलादनिमित्त पोफाळी येथील मुस्लिम बांधव व नवयुवक मंडळाच्या वतीने डीजे व अनावश्यक खर्चाला फाटा देत सर्वधर्मसमभाव आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारा अनोखा उपक्रम राबवण्यात आला.

येथील रेणुकाबाई जाधव अंध विद्यालय आणि के. डी. जाधव मूक-बधिर विद्यालयात सर्वधर्मीय ग्रामस्थांना एकत्र आणून अन्नदानाने सण साजरा करण्यात आला. सध्या हिंदूंचा पवित्र श्रावण महिना सुरू असल्याने धार्मिक भावनांचा आदर करत साध्या जेवणाचे आयोजन करण्यात आले होते.

यवतमाळ जिल्हा परिषदेचे माजी सदस्य जैनुल भाई सिद्दीकी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शंकरराव तालंगकर, माजी जि. प. सदस्य चितंगराव कदम, ठाणेदार निलेश शेंबडे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सूत्रसंचालन पठाण यांनी केले. या उपक्रमाचे नियोजन जहीर भाई, आवेज पठाण, समीर पठाण, मुर्तुझा शेख, सोहेल पठाण, अनवर शेख, महेश देशमुख, शिवाजी हुडेकर व एकता कमिटीच्या युवकांनी केले. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.

# भक्तीचा जयघोष अन् सेवाभावाने दुमदुमले माहूरचे दत्तशिखर

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**महागाव** : श्री दत्तशिखर माहूरगड येथील पंचक्रोशी परिक्रमा धार्मिक उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडली. सुमारे २५ किलोमीटरच्या या परिक्रमेत हजारो भाविकांनी सहभागी होत परिक्रमा मार्गावरील २७ पवित्र तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेतले.

माहूर पीठाधीश्वर महंत डॉ. श्री श्री श्री १००८ श्री धनेश्वर उर्फ श्याम भारती महाराज यांच्या कृपाशीर्वादाने आणि सर्वतीर्थ कुंडाच्या पूजनाने या परिक्रमेचा प्रारंभ झाला.

भाविकांनी सर्वतीर्थ, कमल कुंड, कलेश्वर, गरुडगंगा, मातृतीर्थ, जमदग्नी ऋषी समाधीस्थळ, कपिलेश्वर आश्रम आणि अनुसया माता मंदिर आदी प्रमुख तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेत नामस्मरण केले.



### पंचक्रोशी परिक्रमेत हजारो भाविक लीन

परिक्रमा सुरळीत पार पडण्यासाठी देवस्थान प्रशासनासह महागाव येथील सेवेकऱ्यांसह सुमारे अडीच हजार स्वयंसेवकांनी सेवा बजावली. परिक्रमा मार्गावर ठिकठिकाणी महाप्रसाद, पाणी व अन्नदानाची सोय करण्यात आली होती.

शेवटी सर्वतीर्थ कुंडाचे पूजन, श्री दत्तात्रेयांची महाआरती व मंत्रपुष्पांजलीने या परिक्रमेची भक्तिभावात सांगता झाली.

## अतीवृष्टीमुळे ३७ हजार शेतकऱ्यांचे ३ कोटींचे नुकसान

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**यवतमाळ** : जुलै महिन्यात झालेल्या अतीवृष्टीने ३५ हजार हेक्टरवरील खरिपाच्या पिकांना फटका बसला आहे. ५३५ गावांना याचा फटका बसला आहे. ३७ हजार शेतकऱ्यांचे तीन कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा अहवाल कृषी विभागाने सादर केला आहे. जुलै महिन्यात जिल्ह्यातील सर्वच मंडळात अतीवृष्टीची नोंद झाली. कमी वेळात अधिक बरसलेल्या पावसाने शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. यवतमाळ जिल्ह्यातील १४ तालुक्यांमधील खरिपाच्या पिकांना याचा फटका बसला. यात कापूस, सोयाबीन, तूर, मूग आणि उडीद पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची नोंद कृषी विभागाने केली.

# यवतमाळ जिल्हा बँक निवडणूक : ५२ मतदारांवर डोळा

### 'घोडेबाजारा'ची चर्चा, उमरखेड सोसायटी गटात 'देवसरकर' आमनेसामने

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**उमरखेड** : दीर्घ प्रतीक्षेनंतर यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचे वेध लागताच राजकीय घडामोडींना वेग आला आहे. विशेषतः उमरखेड तालुका सोसायटी गटात इच्छुकांनी मतदारांची जुळवाजुळव सुरू केली असून, अवघ्या ५२ मतदारांच्या या गटात बाजी मारण्यासाठी जोरदार 'घोडेबाजार' होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे.




या निवडणुकीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे 'देवसरकर विरुद्ध देवसरकर' असा रंगणारा सामना. भाजपमधून माजी आमदार प्रकाश पाटील देवसरकर आणि डॉ. अंकुश देवसरकर हे दोघे आखाड्यात उतरण्यास उत्सुक आहेत, तर दुसऱ्या बाजूने काँग्रेसचे नेते राम देवसरकर यांनीही निवडणूक लढवण्याचा ठाम निर्धार केला आहे. भाजपतील दोन गट आणि काँग्रेसचा तगडा उमेदवार यामुळे येथे तिरंगी लढतीचे चित्र स्पष्ट होत आहे.

मागील निवडणुकीत प्रकाश पाटील देवसरकर यांनी बहुमत आपल्या बाजूने झुकवत ही जागा बिनविरोध जिंकली होती. मात्र, गेल्या दशकभरात या गटातील गणिते पूर्णपणे बदलली आहेत. ५२ पैकी अनेक सोसायट्यांमध्ये नवीन चेहरे प्रतिनिधी म्हणून आले आहेत. डॉ. अंकुश देवसरकर यांनी मतदारांशी संवादाची पहिली फेरी पूर्ण करत प्रस्थापितांपुढे तगडे आव्हान उभे केले आहे.

या वेळी ही निवडणूक बिनविरोध होणे अशक्य मानले जात आहे. दुहेरी लढत झाल्यास विजयासाठी २७ मतांची जादुई संख्या गाठणे गरजेचे आहे; मात्र तिहेरी लढतीमुळे समीकरणांचा गुंता वाढला आहे. जुन्या प्रस्थापित नेत्यांचा अनुभव चालणार की मतदारांचा कौल नवीन चेहऱ्याच्या पाठीशी राहणार, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# लोणबेहळ धबधब्याला पर्यटनाचा दर्जा द्या

### 'सर्चलाईट फाऊंडेशन'ची आमदार प्रा. राजू तोडसाम यांच्याकडे मागणी

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**आर्णी** : नागपूर-तुळजापूर महामार्गावर वसलेल्या निसर्गरम्य लोणबेहळ येथील धबधब्याला अधिकृत पर्यटनाचा दर्जा देऊन या परिसराचा कायापालट करावा, अशी मागणी 'सर्चलाईट फाऊंडेशन'चे अध्यक्ष हरिओमसिंह बघेल यांनी निवेदनाद्वारे आमदार प्रा. राजू तोडसाम यांच्याकडे केली आहे.

हा धबधबा थेट महामार्गाला लागून असल्याने विदर्भ व मराठवाड्यातील पर्यटकांसाठी सोयीचा व मुख्य आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. पावसाळ्यात व हिवाळ्यात निसर्गाचे विलोभनीय रूप पाहण्यासाठी येथे पर्यटकांची मोठी गर्दी असते. मात्र, लोकप्रतिनिधींची उदासीनता व प्रशासकीय नियोजनाच्या अभावामुळे हा परिसर अधिकृत पर्यटनाच्या विकासापासून वंचित राहिला आहे. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी संरक्षक कठडे, पिण्याचे शुद्ध पाणी, स्वच्छतागृहे आणि वाहनांच्या सुरक्षित पार्किंगची सोय तातडीने उपलब्ध करून द्यावी.

■ **निसर्गाचा समतोल राखून पर्यावरणपूरक पर्यटनाचा (इको-टुरिझम) आराखडा तयार करावा आणि राज्य शासनाकडून विशेष निधी मंजूर करून घ्यावा.**

पर्यटन विकासामुळे स्थानिक तरुणांना स्टॉल्स, उपाहारगृहे व वाहतूक सेवेच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी मिळून ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी मिळेल.

या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन शासनाकडून तात्काळ ठोस पावले उचलली जावीत, अशी आग्रही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.



# राज्य महोत्सव गणेशोत्सवाच्या स्पर्धेत अधिकाधिक गणेश मंडळांनी सहभाग घ्यावा

## विभागीय आयुक्त नयना गुंडे यांचे आवाहन

प्रतिनिधी २८ ऑगस्ट



**अमरावती:** राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला असून, या अंतर्गत 'उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा' आता तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात येणार आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने १७ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार या भव्य स्पर्धेची घोषणा करण्यात आली आहे. अमरावती विभागातील जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

या स्पर्धेची माहिती पुढील प्रमाणे आहे या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक आणि पात्र मंडळांनी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या ganeshostav.pld-mka.co.in या पोर्टलद्वारे विहित वेळेत दि. ७ सप्टेंबर २०२६ पर्यंत आपला अर्ज ऑनलाईन सादर करावयाचा आहे. स्पर्धेसाठी पात्रता व अटी पुढील प्रमाणे आहेत या स्पर्धेत केवळ संबंधित यंत्रणेद्वारे नोंदणीकृत संस्था अथवा परवानाधारक गणेशोत्सव मंडळेच सहभागी होऊ शकतात. नवीन मंडळांना संधी देण्याच्या उद्देशाने, चालू आर्थिक वर्षाच्या मागील सलग दोन वर्षे राज्यस्तरीय किंवा जिल्हास्तरीय पारितोषिके प्राप्त झालेली सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे यावर्षीच्या पारितोषिकास पात्र ठरणार नाहीत. (सदरची अट राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गणेशोत्सव मंडळांनाही लागू राहील). या स्पर्धेसाठी मंडळांनी केलेल्या कामाचा कालावधी मागील वर्षाच्या अनंत चतुर्दशीपासून चालू वर्षाच्या अनंत चतुर्दशीपर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.

उत्कृष्ट मंडळांना पुरस्कार देण्यात येईल. निवड करताना कलांचे जतन व संवर्धन, संस्कृतीचे जतन, निसर्गाचे व सार्वजनिक संपत्तीचे संवर्धन, सामाजिक कार्य आणि गणेशोत्सव आयोजनातील विधायकता (उदा. पर्यावरणपूरक मूर्ती, सजावट, महिलांचा ३० टक्के सहभाग इत्यादी) या १०० गुणांच्या निकषांवर परीक्षण केले जाईल.

स्पर्धेचे सविस्तर निकष जाणून घेण्यासाठी सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी १७ ऑगस्ट २०२६ रोजीच्या शासन निर्णयाचे सविस्तर अवलोकन करावे तसेच पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या अधिकृत संकेतस्थळाला ganeshostav.pldmka.co.in आवर्जून भेट द्यावी. अधिक माहितीसाठी शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे. तरी समाजाभिमुख आणि पर्यावरणपूरक उत्सव साजरा करणाऱ्या अमरावती विभागातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे आणि मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त, नयना गुंडे यांनी केले आहे.

# दुर्घटना टाळण्यासाठी उपाययोजना करणार- राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर



प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**अमरावती:** जिल्हा स्त्री रूग्णालयात अतिदक्षता विभागात आग लागल्याची दुर्घटना घडली आहे. यात तीन नवजात बालके मृत्यूमुखी पडली. ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. भविष्यात राज्यामध्ये अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिली.

बोर्डीकर यांनी यांनी जिल्हा स्त्री रूग्णालयाला भेट दिली. यावेळी त्यांनी आग लागलेल्या अतिदक्षता विभागाची पाहणी केली. आमदार प्रतापदादा अडसड, महापौर श्रीचंद तेजवानी आदी उपस्थित होते. बोर्डीकर यांनी, जिल्हा स्त्री रूग्णालयातील आगीच्या घटनेची चौकशी करण्यासाठी आरोग्य आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती सर्व बाबींची सखोल चौकशी करून अहवाल देणार आहे. चौकशी कोणत्याही व्यक्तीने दुर्लक्ष केल्याचे सिद्ध झाल्यास त्यांच्याविरूद्ध कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नये, यासाठी राज्यातील सर्व रूग्णालात उपाययोजना करण्यात येतील. रूग्णालयातील बालके इतर रूग्णालयात हलविण्यात आली आहेत. त्यांच्यावर दर्जेदार उपचार करण्यात येतील. तसेच आगीच्या घटनेवेळी कर्मचाऱ्यांनी वेळेचे भान राखत बचाव केला. याबद्दल त्यांनी कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. आगीच्यावेळी गांभीर्याने घटनेचा सामना केल्याबद्दल त्यांनी कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

यावेळी त्यांनी जिल्हा स्त्री रूग्णालयात तातडीने उभारण्यात आलेल्या अतिदक्षता कक्षाला भेट देऊन पाहणी केली.

## मेडिकलमध्ये शिरली कार




कठोरा नाका परिसरातील आरोग्य भारती मेडिकल मध्ये कार शिरली. हा विचित्र अपघात आज सकाळी घडला असून कारचालक किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे. अपघात पाण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.

# भांभोरा येथे वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

## माजी खासदार नवनीत राणा यांची भेट



**अमरावती:** वाघाला लवकर जेल बंद करावे ह्या सूचना फॉरेस्ट अधिकाऱ्यांना आदेश दिला.

आज मोर्शी तालुक्यातील भांभोरा येथे शेतामध्ये काम करीत असताना शेतकरी चरणदासजी इखे यांच्यावर वाघाने हल्ला केला. या दुर्दैवी घटनेत त्यांचा मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली असून, शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या दुःखद घटनेची माहिती मिळताच भाजप नेत्या तसेच माजी खासदार नवनीत राणा यांनी भांभोरा येथे भेट देऊन घटनास्थळाची पाहणी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पालकमंत्री बावणकुळे, कलेक्टर आशिष येरेकर, सीसीएफ बॅनर्जी याना माहिती दिली यावेळी युवा स्वाभिमान पार्टीचे जिल्हाध्यक्ष प्रकाशजी साबळे, महिला जिल्हाध्यक्ष सोनालीताई नवले, तसेच भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख निवेदिता चौधरी अजयभाऊ वरघट, राजेंद्रभाऊ कापडे, शंतनुभाऊ देशमुख, विकासभाऊ तटे, धीरजभाऊ केने, प्रदीपभाऊ अलोने, गजाननभाऊ वरघट, केतनभाऊ अलोने, अनुल्लाभाई आदी उपस्थित होते.

यावेळी माजी खासदार नवनीतजी राणा यांनी स्वर्गीय चरणदासजी इखे यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. या दुःखद प्रसंगी इखे कुटुंबीयांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची ग्वाही देत, कुटुंबीयांना धीर दिला.

परिसरात वाघाचा वावर लक्षात घेता शेतकरी व ग्रामस्थांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. त्यामुळे वनविभागाने तातडीने ठोस उपाययोजना करून नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करावे, तसेच स्वर्गीय चरणदासजी इखे यांच्या कुटुंबीयांना शासनाच्या नियमानुसार तातडीने आर्थिक मदत व आवश्यक शासकीय सहाय्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी प्रशासनाने कोणतीही हलगर्जीपणा न करता तातडीने आवश्यक पावले उचलावीत, हीच या दुःखद घटनेनंतरची प्रमुख अपेक्षा आहे.

# पुजद्यात महिलांनी फुंकले परिवर्तनाचे रणशिंग!

प्रतिनिधी २८ ऑगस्ट



**पुजदा:** "सांदी-कोपऱ्यात राहायचं नाही, राज्य करायला भ्यायचं नाही!" आणि "विवेकाचा आवाज बुलंद करूया!" अशा जोशपूर्ण घोषणांनी पुजदा गाव दुमदुमून गेले. महिलांचे नेतृत्व, राजकीय सहभाग आणि सामाजिक परिवर्तनाची दिशा निश्चित करणाऱ्या महिला राजसत्ता आंदोलनाच्या पुजदा गावशाखेचा फलक उद्घाटन सोहळा, महिलांसाठी राजसत्ता आंदोलनाची कार्यशाळा आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने अंधश्रद्धा निर्मूलन जनजागृती कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

गावाच्या मुख्य रस्त्यालगत महिला राजसत्ता आंदोलनाच्या गावशाखेच्या फलकाचे उद्घाटन सरपंच उज्वलभाऊ दळवी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा प्रधान सचिव विजय डवरे, महिला राजसत्ता आंदोलनाच्या जिल्हा समन्वयक प्रतिभा खापरे यांच्यासह गावशाखेतील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

फलक उद्घाटनानंतर ग्रामपंचायत कार्यालयात महिलांसाठी विशेष कार्यशाळा घेण्यात आली. महिला राजसत्ता आंदोलनाची पार्श्वभूमी, सुरुवात, उद्दिष्टे, कार्यपद्धती तसेच गावशाखेची जबाबदारी, महिलांची भूमिका आणि गावपातळीवर संघटितपणे काम करण्याच्या पद्धती याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

याच कार्यक्रमात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीची भूमिका व कार्य याबाबत महिलांना माहिती देण्यात आली. अंधश्रद्धा, रूढी-परंपरा आणि अवैज्ञानिक समजुतींविरोधात वैज्ञानिक दृष्टिकोन व विवेकाची भूमिका मांडण्यात आली. समितीची पंचसूत्री महिलांना समजावून सांगण्यात आली.कार्यक्रमात महिला राजसत्ता आंदोलनाच्या पुजदा गावशाखेची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. अध्यक्ष अनुराधा गोफने, उपाध्यक्ष सुषमा रहाटे, सचिव शीतल शिंदे, कोषाध्यक्ष प्रिया इंगळे, नेतृत्वशील महिला वर्षा भुजाडे, संघटिका प्रणिता वानखडे आणि सहसंघटिका सविता नागदिवे तर सदस्य म्हणून अपर्णा झाडे, पूनम चोरे, उषा काकडे, नाजमीन अशफाक अली, अंजुम बानो शेख शादिक, वाहिद अंजुम साजिद मुल्ला, रुकसाना इरफानोद्दीन आणि हीना अफसर अली यांचा समावेश करण्यात आला. कार्यक्रमात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अमरावती व संविधान जागर अभियानाच्या वतीने महिलांना 'शिवाजी महाराज' हे पुस्तक देण्यात आले.

गावातील नेतृत्वशील महिला तसेच उपस्थित मान्यवरांचा शाल, श्रीफळ आणि महिला राजसत्ता आंदोलनाचा दुपट्टा देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच उज्वल दळवी होते. प्रमुख उपस्थितीत उपसरपंच अरुणभाऊ शिंदे, प्रशासक सदस्य अपर्णा झाडे, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अमरावतीचे जिल्हा प्रधान सचिव विजय डवरे, जिल्हा कार्याध्यक्ष प्रफुल्ल मंदा श्रीधर, संजय खापरे, महा. अनिस पुजदा शाखेचे कार्याध्यक्ष राहुल वाघमारे, महा. अनिस देवरा शाखेचे कार्याध्यक्ष सौरभ देशमुख आणि महिला राजसत्ता आंदोलनाच्या जिल्हा समन्वयक प्रतिभा खापरे यांची उपस्थिती होती.

# राजकमल चौकातील अनधिकृत व लोंबणाऱ्या केबल्सवर मनपाची कारवाई

प्रतिनिधी २८ ऑगस्ट



**अमरावती :** अमरावती महानगरपालिका हद्दीतील पथदिव्यांच्या खांबांवर तसेच शहरातील प्रमुख चौकांमध्ये अनधिकृतपणे टाकण्यात आलेल्या ऑप्टिकल फायबर केबल्समुळे सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण होत असून, लोंबणाऱ्या केबल्समुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेचे उपमहापौर सचिन भेंडे यांनी मनपा आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांना लेखी पत्र देऊन अमरावती-बडनेरा मुख्य मार्गासह शहरातील अनधिकृत व लोंबकळणाऱ्या केबल्स काढण्याची मागणी केली होती. त्यानुसार, २७ ऑगस्ट रोजी शहरातील प्रमुख चौक असलेल्या राजकमल चौकात मनपाच्या पथकाने कारवाई करत लोंबकळणाऱ्या अनधिकृत केबल्स काढल्या. तसेच वापरात नसलेल्या अनावश्यक डेड केबल्सही कापून हटविण्यात आल्या.

शहरातील विविध भागांत अनधिकृतपणे टाकण्यात आलेल्या ऑप्टिकल फायबर केबल्स तसेच लोंबकळत असलेल्या केबल्स संबंधित केबल ऑपरेटर्सनी तातडीने स्वतःहून काढून घ्याव्यात, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे. या कारवाईदरम्यान स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, गटनेता नाना आमले, सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर, उपअभियंता शरद तिनखेडे, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, स्वच्छता निरीक्षक प्रशांत गावनेर यांच्यासह मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# अमरावतीत प्लास्टिक प्रतिबंधक मोहिमेत 6 हजारांचा दंड वसूल

प्रतिनिधी २८ ऑगस्ट




**अमरावती :** अमरावती महानगरपालिकेच्या वतीने सिंगल यूज प्लास्टिकच्या वापरास प्रतिबंध करण्यासाठी साईनगर परिसरात विशेष मोहीम राबविण्यात आली. महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक व उपायुक्त (१) भाग्यश्री बोरेकर यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली.

वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, स्वास्थ्य अधीक्षक विजय बुरे तसेच झोन क्र. ४ चे सहाय्यक आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या मोहिमेदरम्यान प्रतिबंधित सिंगल यूज प्लास्टिकचा वापर, परिसरातील स्वच्छता आणि दुकानदारांकडे ओला व सुका कचरा टाकण्यासाठी दोन स्वतंत्र डस्टबिन उपलब्ध आहेत की नाही, याची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान करवा डिस्पोजेबल येथे प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर आढळून आल्याने ५ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. तसेच जय माता दि प्रोव्हीजन येथे दोन डस्टबिन उपलब्ध नसल्याचे आढळल्याने १ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. या कारवाईतून एकूण ६ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

या मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक शारदा गुल्हाने, स्वास्थ्य निरीक्षक सोपान माहुलकर, प्रियंका बैस, प्रवीण उसरे, वैभव खरड, सुमेध मेश्राम, सचिन सैनी सहभागी झाले होते.

महानगरपालिकेकडून प्लास्टिक प्रतिबंधक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही नियमितपणे दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे महानगरपालिका प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# गणेशोत्सवासाठी अधिकृत वीज जोडणी घ्या

## महावितरणचे गणेश मंडळांना आवाहन

**अमरावती :** यंदाचा गणेशोत्सव निर्विघ्न आणि सुरक्षित वातावरणात साजरा करण्यासाठी सर्व गणेशोत्सव मंडळांनी वीज सुरक्षेची योग्य ती खबरदारी घ्यावी, तसेच उत्सव कालावधीत केवळ अधिकृत वीज जोडणीच (वीज कनेक्शन) घ्यावी, असे आवाहन 'महावितरण'कडून करण्यात आले आहे.

उत्सवाच्या काळात कोणतीही अप्रिय घटना वा दुर्घटना घडू नये याची खबरदारी घ्यावी. आगमन आणि विसर्जन मिरवणुकीदरम्यान रस्ते तसेच गल्लीबोळांतील विजेच्या तारांची (वीजवाहिन्या) उंची लक्षात घेऊनच गणेशमूर्तीची उंची व रथाची रचना निश्चित करावी. त्याचप्रमाणे मंडप आणि रोषणाईसाठी वीज संचाची मांडणी करताना सुरक्षेच्या नियमांचे पालन केले जावे. अपघात टाळण्यासाठी केवळ प्रमाणित आणि कुशल विजेच्या ठेकेदारांकडूनच हे काम करून घ्यावे. गणेश मंडळांसाठी वीज जोडणी घेण्याची प्रक्रिया महावितरणने अत्यंत सोपी केली आहे. मंडळांना महावितरणच्या अधिकृत मोबाईल ॲप किंवा ऑनलाईन संकेतस्थळावरून अर्ज करून त्वरित तात्पुरती वीज जोडणी मिळवता येणार आहे.

सार्वजनिक सुरक्षेचा विचार करता कोणत्याही मंडळाने अनधिकृतपणे विजेचा वापर करू नये, तसेच विजेच्या तारा किंवा खांबांजवळ मंडप उभारताना पुरेशी काळजी घ्यावी, असेही महावितरणने स्पष्ट केले आहे. गणेश मंडळाची सजावट करतांना पर्यावरण पूरक ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी सौर ऊर्जा मंडप आणि एलईडी दिव्यांचा वापरातून वीज बचतीचा संदेश देणारी सजावट करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

# दर्यापूर बाजार समिती संचालकाने मागितली माफी..

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**दर्यापूर :** दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत भगवा दुपट्टा परिधान करून येण्यासंदर्भातील कथित वक्तव्यावरून शिंदेसेनेने आक्रमक भूमिका घेतली होती. या प्रकरणी संबंधितांनी जाहीर माफी मागावी, अशी मागणी करत शिंदेसेनेने आंदोलनाचा इशारा दिला होता.गेल्या काही दिवसांपूर्वी हमाल-अडते मतदारसंघाचे संचालक आसिफ पैलवान यांनी शेतकऱ्यांनी भगवा दुपट्टा घालून बाजार समितीत येऊ नये, असे वक्तव्य केल्याचा आरोप शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला होता. या वक्तव्यामुळे शिवसैनिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. या प्रकरणाची दखल घेऊन शिवसेना दर्यापूर तालुक्याच्या वतीने आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता.

गुरुवारी शिवसेनेने बाजार समितीवर मोर्चा काळत जोरदार घोषणाबाजी करत संबंधित संचालकाने माफी मागावी, अशी ठाम मागणी केली. यानंतर बाजार समिती संचालक मंडळ व शिवसेना पदाधिकाऱ्यांमध्ये बैठक झाली. बैठकीदरम्यान या संपूर्ण प्रकरणावर चर्चा करण्यात आली. त्यानंतर संचालक आसिफ पैलवान यांनी घडलेल्या प्रकाराबाबत सर्वांसमोर हात जोडून माफी मागत दिलगिरी व्यक्त केली.



## भगवा दुपट्टा वाद

या आंदोलनात माजी जिल्हाप्रमुख गोपाल अरबट, नगरसेवक प्रदीप मलिये, तालुकाध्यक्ष गणेशराव लाजुरकर, मनोज गव्हाणे, शहराध्यक्ष महेंद्र भांडे, तुषार चौधरी, अतुल सगणे, आशिष धानोरकर, योगेश भाऊ बुंदे, विनय गावंडे, शाम साखरे, संजय राने, नागेश कांबे, किशोर दुतोंडे, सौरभ मलिये, राहुल भुंबर, शरद आठवले, कमलेश वानखडे, गणेश धुरटे, निरज नागे, योगेश मोपारी, सागर विल्हेकर, शरद अरबट, गजानन अरबट, रविभाऊ पवार, वैभव भांडे, संदिप राजगुरे, वैभव काळे, शुभम साखरे, आकाश नागपुरे, गोकुळ चांदुरकर, विलास साखरे, सागर फलके, विनोद पाचकवडे, सागर गेठे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शुक्रवार दि. २८ ऑगस्ट २०२६ http://epaper.citynewssuperfast.com









# आर्थिकतेमुळे यंत्रणा आखडली, जिल्ह्यात २५० कोटींचे देयके रखडली...

# फिरवा-फिरवीची खेळी, कंत्राटदाराचा जातो बळी!

## *कामे पूर्ण करूनही शासनाकडून निधी मिळेना; काय करावे ते कळेना * वाशीम जिल्हा कंत्राटदार संघटना आक्रमक

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

शासनाच्या विविध विभागांची विकासकामे पूर्ण करूनही जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयातील २५० कोट्यवधी रुपयांची देयके रखडल्याने कंत्राटदार आर्थिक संकटाच्या खाईत लोटले गेले आहेत. कामे पुर्णकरूनही शासनाकडून निधी मिळेना. काय करावे ते कळेना. अशा परिस्थितीत राज्यातील सात कंत्राटदारांनी आत्महत्या केल्या आहेत. या गंभीर परिस्थितीविरोधात वाशिम जिल्हा कंत्राटदार संघटनेने गुरुवारी (२७ ऑगस्ट) जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या मार्फत शासनाला निवेदन दिले.

युवा कंत्राटदार गजानन देवकते यांनी प्रलंबित देयकांच्या आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केल्याचा दाखला देत संघटनेने शासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र संताप व्यक्त केला. आतापर्यंत राज्यात सात कंत्राटदारांनी आत्महत्या केल्याचे नमूद करीत, परिस्थिती अशीच राहिल्यास आत्महत्यांची शृंखला वाढण्याची भीती कंत्राटदार संघटनेने व्यक्त केली आहे. मुख्यमंत्र्यांनी तातडीने हस्तक्षेप करून आत्महत्याग्रस्त कंत्राटदारांची सर्व प्रलंबित देयके अदा करावीत, तसेच दीर्घकाळ रखडलेला निधी त्वरित वितरित करावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी संघटनेचे पश्चिम विदर्भ अध्यक्ष सुधीर उर्फ राजूभाऊ देशमुख, जिल्हाध्यक्ष राजूभाऊ अग्रवाल, सचिव स्वप्नील सरनाईक, उपाध्यक्ष मुकेश ठाकूर, संजय डिवरे,



सहसचिव निकुंज देवानी, ऋषभ सरनाईक, शेखर बंठे, आकाश घुगे, भूषण कंकणे, सोज्वल माकोडे, गौरव ठाकूर, बाळासाहेब अंभोरे, तरूण व्यास, ऋषीकेश ठोके, यांच्यासह कंत्राटदार उपस्थित होते. सामाजिक, मानसिक स्थितीवर परिणाम कर्जाचे हप्ते, बँकांचा तगादा, उधारीचे देणे आणि साहित्य पुरवठादारांची देणी यामुळे कंत्राटदार आर्थिक विवंचनेत सापडले आहेत. अनेकांची बँक खाती एनपीएमध्ये जाण्याची वेळ आली असून, आर्थिक संकटाचा थेट परिणाम त्यांच्या सामाजिक आणि मानसिक स्थितीवर होत असल्याचे संघटनेने म्हटले आहे.

**२५० कोटींची देयके रखडली!**

वाशिम जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांनी कामे होऊनही कंत्राटदारांची सुमारे २५० कोटी रुपयांची देयके अद्याप प्रलंबित असल्याचा दावा कंत्राटदार संघटनेने केला आहे. कामे पूर्ण करूनही निधी न मिळाल्याने कंत्राटदारांची आर्थिक कोंडी बिकट झाली आहे.

## थोडक्यात

### मंगरुळपीर ब्रह्माकुमारीज सेवा केंद्रात रक्षाबंधन कार्यक्रम

• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

मंगरुळपीर येथील प्रजापीता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयात दि. २३ऑगस्ट रविवारी रक्षाबंधन कार्यक्रम संपन्न झाला. अकोला वाशीम ब्रह्माकुमारीज सेवा केंद्राच्या प्रमुख राजयोगिनी ब्रह्माकुमारी रुख्मिणी दीदीजी व अकोला सेवा केंद्र संचालिका ब्रह्माकुमारी सुमन दीदी यांच्या प्रमुख उपस्थितीत रक्षाबंधन कार्यक्रम साजरा करण्यात आला. मंरुळपीर सेवा केंद्र संचालिका बीके सारिका यांनी दीदीजींचे आदरातिथ्य व स्वागत केले. रुख्मिणी दीदींनी उपस्थित भाऊ बहिणींना रक्षाबंधन या पवित्र सणाचे अध्यात्मिक महत्व सांगितले. रुक्मिणी दीदीजी व सुमन दीदीजी यांच्या शुभ हस्ते उपस्थित सर्व भाऊ बहिणींना राखी बांधण्यात आली. प्रसंगी मंरुळपीर ब्रह्माकुमारीज परिवारातील बहुसंख्य भाऊ बहिणी उपस्थित होते. रक्षाबंधन कार्यक्रम नियोजनासाठी ब्रह्माकुमारी गौरी दीदी सह परिवारातील भाऊ बहिणींनी महत्वपूर्ण सहकार्य केले.

### गणेशोत्सवातील उत्कृष्ट सार्वजनिक मंडळांना मिळणार शासनाचा पुरस्कार

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

सन २०२६ च्या गणेशोत्सवात सहभागी होणाऱ्या जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची निवड करून त्यांना शासनाकडून पुरस्कार देण्यासाठी स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार या स्पर्धेसाठी मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या असून, त्यानुसार वाशिम जिल्ह्यात जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय निवड समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनुसार पुरस्कारासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची निवड करण्याची कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार स्पर्धेचे पुढील कामकाज करण्यासाठी संबंधित समित्यांना आदेश देण्यात आले आहेत.

## मोकाट कुत्र्यांचा हल्ल्यात जेष्ठ नागरिक व लहान मुलं जखमी!

### *नगरपरिषद, पोलीस प्रशासन व लोकप्रतिनिधी लक्ष देतील का? *एका महिन्यात आठ ते दहा घटना

• सिटी न्युज ब्युरो @ कारंजा •

कारंजा शहरातील जेष्ठ नागरिक, लहान मुलं व प्राण्यावर मोकाट कुत्र्यांचे जीव घेणे हल्ले दिवसेंदिवस वाढत असून हा प्रश्न गंभीर होत चालला आहे, या प्रश्नाकडे नगरपरिषद प्रशासन पोलीस प्रशासन व लोकप्रतिनिधींनी लक्ष देणे गरजेचे आहे.

सविस्तर माहिती अशी की. गेल्या काही महिन्यापासून शहरात कुत्र्यांच्या हल्ल्यात ज्येष्ठ नागरिक, लहान मुलं व बकरी जखमी झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. शहरातील मोकाट कुत्र्यांचे कळप





रस्त्यावर फिरत असून, त्यांचा त्रास लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दुचाकीस्वारांना मोठ्या प्रमाणात सहन करावा लागत आहे. परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की, आता कुत्रे लहान मुले व बकऱ्यांना आपले भक्ष्य समजू लागले आहे आणी तशाच प्रकारचा हल्ला ते करत आहे, त्यामुळे कारंजा शहरातील नागरिक, लहान मुले सुरक्षित आहे का असा सवाल उपस्थित होत आहे. मोकाट कुत्रे पकडण्याच्या संदर्भात नगरपरिषदेने मासिक सभेमध्ये ठराव सुद्धा घेतला होता आणि त्यावर मोकाट कुत्रे पकडण्याची कारवाई सुद्धा सुरू केली होती पण यावर काही प्राणी प्रेमी यांनी आक्षेप घेऊन कारंजा पोलीस स्टेशनला तक्रार देण्यापर्यंत गोष्ट गेली होती. यामुळे नगर परिषदेने मोकाट कुत्री पकडण्याची कारवाई थांबवली अशी माहिती सूत्राकडून मिळाली आहे. यामध्ये पोलीस प्रशासनाचे सहकार्य सुद्धाअपेक्षित आहे.

पण शहरातील सर्वसामान्य नागरिकांना मोकाट कुत्र्यापासून होणारा त्रास होणारे जीवघेणे हल्ले पाहता मोकाट कुत्रे पकडण्याची कारवाई आवश्यक आहे. मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण, लसीकरण, पकड मोहीम, धोकादायक कुत्र्यांवर नियंत्रण यांसारख्या उपाययोजना तातडीने राबविण्याची गरज आहे.

## श्री सत्य साई प्रेम प्रवाहिनी रथयात्रेचे ६ सप्टेंबरला वाशीम येथे आगमन

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

भगवान श्री सत्य साई बाबांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त संपूर्ण भारतभर आयोजित करण्यात आलेली श्री सत्य साई प्रेम प्रवाहिनी रथ यात्रा रविवार, ६ सप्टेंबर २०२६ रोजी वाशिम शहरात दाखल होणार आहे. श्री सत्य साई सेवा समिती, वाशिम जिल्ह्याच्या वतीने या रथ यात्रेचे भव्य स्वागत तसेच विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



रविवारी दुपारी ३ वाजता प्रेम प्रवाहिनी रथाचे पुसद नाका येथे आगमन होणार असून, पुष्पवृष्टीसह रथाचे स्वागत करण्यात येणार आहे. त्यानंतर दुपारी ३ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेचा मार्ग मन्नासिह चौक, शुक्रवारपेठ, राजनी चौक, दिघेवाडी, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पाटणी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते विठ्ठलवाडी परिसर असा राहणार आहे.

## सादरीकरण न घेता वृद्ध कलावंतांची निवड केल्याचा आरोप

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

सन २०२४ व २०२५ मध्ये सादरीकरण होऊन ही पात्र कलावंतांना लाभातून वगळण्यात आले असून, सन २०२५/२६ ची यादी विना सादरी करण न करताच निवडण्यात आल्याचा आरोप मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि प वाशिम यांना दिलेल्या निवेदनात कलावंतांनी केला असून यादीतील शासकीय लाभतात्पुरता थांबवून पुन्हा सादरीकरण घ्यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे



बबनराव गणपत लाडके, वय ६१ वर्षे, रा. कासोळा, ता. मंगरुळपीर जि. वाशिम व त्यांच्यासह सर्व अर्जदारांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम यांना दि. २१/०८/२०२६ रोजी हे निवेदन सादर केले आहे. या निवेदनावर सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद वाशिम येथे आवक शिक्का देखील आहे. निवेदनात म्हटले आहे की, 'आमच्या माहितीप्रमाणे आम्ही सत्य बयान करतो की, २०२४ व २०२५ ही कलावंतांची यादी सादरीकरण होऊन सुद्धा लाभातून) वगळण्यात आली. सन २०२४ चा न विचार करता सन २०२५-२६ ची विनासादरीकरण निवड झाली आणि यादी सुद्धा मानधनास पात्र झाली. तरी असो, परंतु या यादीत खरे व वृद्ध कलावंत असावेत. यामध्ये कित्येक जण कलावंताच्या कोसो दूर असून सुद्धा पात्र आहेत.

करिता यांचं सादरीकरण होणे गरजेचे आहे. तरी सादरीकरण घेण्यात यावे. सादरीकरण झाल्यानंतर मानधनाचा लाभ देण्यात यावा. परंतु असे न झाल्यास आमच्या सर्व अर्जदाराच्या मनावर मोठा आघात होईल आणि नाईलाजास्तव उपोषणाकडे वळावे लागेल, असे कलावंतांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे. या प्रकरणी संगीत व कला क्षेत्रातील तज्ज्ञांसमोर पारदर्शकपणे सादरीकरण घेऊनच खऱ्या कलावंतांना न्याय द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## पुरुषोत्तम चितलांगे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम!

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

मंगरूळपीर भारतीय जनता पार्टीचे वाशिम जिल्हा अध्यक्ष व चितलांगे इंडियन गॅस एजन्सी चे संचालक मा. पुरुषोत्तम लालचंद चितलांगे यांच्या ५२ व्या वाढदिवसानिमित्त दि. १ सप्टेंबर २०२६ रोज मंगळवारी कृष्णा लॉन अँड मॅरेज हॉल वाशिम रोड रोड येथे विविध कार्यक्रमाचे नि शुल्क आयोजन करण्यात आले आहे. भव्य आरोग्य तपासणी शिबिर असून यावेळी डॉ श्री गोपाल हेंबाडे स्त्री रोग तज्ञ व प्रसुती वंध्यत्व निवारण तज्ञ डॉ. श्री विवेक साबू अस्थिरोगतज्ञ डॉ. नागेश शिरसाठ मधुमेह व हृदयविकार तज्ञ डॉ श्री योगेश जाजू कान नाक व घसा तज्ञ डॉ. वाशिम डॉ जयंत पिंपळकर मंगरूळपीर जनरल फिजिशियन डॉ. श्री रोशन लाहोटी दंतरोग तज्ञ मंगरूळपीर डॉ. ज्ञानेश्वर



व्ही ढोबळे श्वासन दमा मधुमेह तज्ञ डॉ. रुचिता जाधव स्त्रीरोग व दुर्बिन शस्त्रक्रिया तज्ञ डॉ. उमेश ठोंबरे त्वचारोग व केशविकार तज्ञ वाशिम डॉ. दिलीप रत्नपारखी मंगरूळपीर जनरल फिजिशियन डॉ. श्री दीपक ढोके वाशिम आयुर्वेद तज्ञ त्वचारोग वातरोग मूळव्याध तज्ञ डॉ. अभय बर्गे मंगरूळपीर नवजात शिशु व बालरोग तज्ञ तसेच डॉ. श्री अजय वाघमारे नेत्ररोग तज्ञ मंगरूळपीर गरजू रुग्णांना मोफत चष्मे वितरण तर या वेळी रक्तदाब ब्लड शुगर तपासणी इसीजी तपासणी सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या शिखर सेल तपासणी डोळ्याची तपासणी तोंडाचा कर्करोग मौखिक आरोग्य तपासणी ग्रामीण रुग्णालय मंगरूळपीर व जिल्हा रुग्णालय वाशिम यांच्यातर्फे या शिबिरात निशुल्क केली जाईल. रक्तदान शिबिर शासकीय रक्त संकलन केंद्र जिल्हा रुग्णालय वाशिम यांच्या सौजन्याने प्रधानमंत्री अपघात विमा दोन लक्ष रुपये किमतीचा फक्त महिलांसाठी स्टेट बँक ऑफ इंडिया चा इन्शुरन्स असून स्टेट बँकेचे खाते आधार कार्ड व पासबुक सोबत आणावे सुप्रीम भगत एसबीआय ग्राहक सेवा केंद्र हे आपले सेवा देतील. प्रधानमंत्री आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना याचे पोर्टल द्वारे निशुल्क कार्ड नोंदणी सेवा या शिबिरात उपलब्ध राहील. डॉक्टर श्री विवेक साबू यांचे साई मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटल वाशीम यांच्या सौजन्याने शिबिरात येणाऱ्या प्रत्येकाला आरोग्य काळ मोफत दिल्या जाईल या कार्डधारकांना १ सप्टेंबर २०२६ पासून पुढील १ वर्षा करिता मनका विकार मुतखडा आजार फॅक्चर मोफत तपासणी ही सेवा उपलब्ध राहील ५२ शस्त्रक्रिया मोफत राहतील तरी गरजू व्यक्तीने या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आयोजक व विनीत भारतीय जनता पार्टी शहर व ग्रामीण मंगरुनाथ चितलांगे इंडियन गॅस एजन्सी मंगरूळपीर जिल्हा वाशिम सर्व पदाचे पदाधिकारी कार्यकर्ते व मित्रपरिवार वाशिम जिल्हा यांनी कळविले आहे. या शिबिरामध्ये फक्त गरजू रुग्णांना औषधी मोफत दिले जाईल गरजवंतांना आवश्यक असल्यास मोफत चष्मे देण्यात येतील असे ही यावेळी कळविण्यात आले आहे.

### मानव विकास मिशन नावालाच...

## क्षमतेपेक्षा जास्त गर्दी; विद्यार्थिनींच्या जीवाशी मस्करी, मुख्याध्यापकांची टाळाटाळ भारी!




• प्रभाकर नाईकवाडे @ केनवड •

रिसोड तालुक्यातील केनवड येथील श्री शिवाजी हायस्कूल व श्री ज्ञा. चं. गोळे कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला आहे. मानव विकास बस नावालाच, क्षमतेपेक्षा जास्त गर्दीत विद्यार्थिनींचा प्रवास सुरू असल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. एकाच बसमधून क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थिनी प्रवास करत असल्याचा प्रकार सध्या सुरू असून, त्यामुळे विद्यार्थिनींच्या जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. या गंभीर प्रश्नाबाबत माहिती घेण्यासाठी पत्रकाराने शाळेचे मुख्याध्यापक शिंदे यांच्याशी वारंवार संपर्क साधून शाळेत भेट दिली; मात्र माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात आल्याने मुख्याध्यापकांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

याबाबत माहिती घेण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक शिंदे यांच्याशी वारंवार शाळेत भेट देऊन संपर्क साधण्यात आला. मात्र, बसच्या प्रत्येक फेरीतील विद्यार्थिनींची संख्या, गावनिहाय टप्पे आणि फेऱ्यांचे नियोजन याबाबत माहिती घेण्यासाठी वारंवार प्रयत्न करूनही तत्काळ माहिती उपलब्ध करून देण्यात आली नाही. विद्यार्थिनींच्या जीवाला धोका असूनही माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात आल्याचे दिसून आले. माहिती घेण्यासाठी वारंवार शाळेत पोहोचत असताना अखेर 'आज नाही, २९ तारखेला या; माहिती देतो,' असे उत्तर या शाळेचे मुख्याध्यापक शिंदे यांनी दिले.




विद्यार्थिनींच्या जीवाला धोका असूनही असा बेजबाबदारपणा कशासाठी, असा प्रश्न उपस्थित होत आहे. अंचळ, कोयाळी, चांडस, तरोडी, कळमगव्हाण, कोळगाव, नावली, जोगेश्वरी आदी गावांमधून विद्यार्थिनी शाळेत येतात. मानव विकास मिशनअंतर्गत बसची सुविधा उपलब्ध असली तरी एकच बस आणि विद्यार्थिनींची संख्या मोठी असल्याने काही विद्यार्थिनींना उभे राहून प्रवास करावा लागत असल्याची तक्रार पालकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

एकाच बसला अनेक फेऱ्या कराव्या लागत असल्याने विद्यार्थिनींच्या शाळेच्या वेळेवरही परिणाम होत आहे. काही विद्यार्थिनींचे एक-दोन शैक्षणिक तास तसेच विषय व ट्रेडचे तास प्रभावित होत असल्याचे पालकांचे म्हणणे आहे. परतीच्या प्रवासात उशीर होत असून, काही वेळा अंधार पडल्यानंतर घरी पोहोचावे लागत आहे. अशा परिस्थितीत एखादी अनुचित घटना घडल्यास याला जबाबदार कोण, असा सवाल उपस्थित करत पालकांनी चिंता व्यक्त केली आहे. या समस्येबाबत शाळेने संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करून अतिरिक्त बसची मागणी केल्याचे मुख्याध्यापक शिंदे यांनी सांगितले आहे. मात्र, प्रत्यक्षात अतिरिक्त बस उपलब्ध झालेली नसल्याने समस्या कायम असल्याचे पालकांचे म्हणणे आहे. त्यामुळे विद्यार्थिनींची संख्या, बसची क्षमता आणि फेऱ्यांचे नियोजन याचा आढावा घेऊन तातडीने अतिरिक्त बस उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे. दरम्यान, विद्यार्थिनींच्या जीवाला धोका असल्याकारणाने या संदर्भात माहिती घेण्यासाठी पत्रकाराने शाळेत तीन-चार वेळा भेट दिली. मात्र, माहिती देण्यास विलंब झाल्यानंतर 'साहेबांना विचारा आणि बातमी लावा,' अशा आशयाचे उत्तर येथील मुख्याध्यापक शिंदे यांनी दिले. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेशी संबंधित सार्वजनिक प्रश्नावर माहिती घेण्यासाठी पत्रकाराने संबंधितांची बाजू जाणून घेण्याचा प्रयत्न केला असताना, या भूमिकेमुळे प्रश्न उपस्थित झाले आहेत. पत्रकाराचे काम समाजातील प्रश्न आणि वस्तुस्थिती जनतेसमोर मांडणे असून, संबंधितांची बाजू घेणे हीदेखील पत्रकारितेची जबाबदारी आहे. त्यामुळे 'साहेब मोठे की विद्यार्थिनींची सुरक्षा?' हा प्रश्न आता पालकांकडून उपस्थित होत आहे. विद्यार्थिनींची संख्या आणि बसची क्षमता यामध्ये तफावत असल्यास एखादी अनुचित घटना घडण्यापूर्वीच प्रशासनाने उपाययोजना करणे गरजेचे आहे. मानव विकास मिशनअंतर्गत उपलब्ध बसचा उद्देश विद्यार्थिनींचे शिक्षण सुरळीत ठेवणे आणि सुरक्षित वाहतूक उपलब्ध करून देणे हा आहे. त्यामुळे अतिरिक्त बस उपलब्ध करून विद्यार्थिनींचा सुरक्षित प्रवास आणि त्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे, अशी मागणी पालक व नागरिकांकडून होत आहे.

## माणुसकी लाचार, चिमुकलीवर अत्याचार

### आठ वर्षीय चिमुकलीवर ६५ वर्षीय वृद्धाकडून विनयभंग

### आरोपी पोलिसांच्या ताब्यात

• सिटी न्युज ब्युरो @ रिसोड •

रिसोड तालुक्यातील एका गावात आठ वर्षीय चिमुकलीचा ६५ वर्षीय वृद्धाने विनयभंग केल्याची संतापजनक आणि माणुसकीला काळीमा फासणारी घटना २७ऑगस्ट रोजी संध्याकाळी ६ वाजेच्या सुमारास घडली. या अमानुष कृत्यामुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली असून गावातील नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

या घटनेतील आरोपी अंबादास पवार असे ताब्यात घेतलेल्या ६५ वर्षीय आरोपीचे नाव आहे. घटनेची माहिती मिळताच रिसोड पोलिसांनी तातडीने हालचाली करत संशयित आरोपीला ताब्यात घेतले आहे. पीडित बालिकेच्या नातेवाईक कडून तक्रारीवरून आरोपीविरुद्ध विनयभंग तसेच लैंगिक अपराधांपासून बालकांचे



संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची

कायदेशीर प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती, अशी माहिती रिसोड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रामेश्वश चव्हाण यांनी दिली.

वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन उपविभागीय पोलीस अधिकारी पवार यांनी रिसोड पोलीस ठाण्याला प्रत्यक्ष भेट देऊन प्रकरणाचा आढावा घेतला. या घटनेचा सखोल तपास करून आरोपीवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. या घटनेमुळे तालुक्यातील चिमुकल्यांच्या व महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# बंद घरात चोरीचा प्रयत्न; पोलिसांच्या सायरनने चोरट्यांचा डाव फसला

## तीन चोरटे सीसीटीव्हीत कैद; आदर्शनगरातील घटना

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**खामगाव :** खामगाव तालुक्यातील तीन चोरटे सीसीटीव्हीत कैद प्रतिनिधी खामगाव शहरातील आदर्शनगर परिसरातील बंद घरात तीन चोरट्यांनी चोरीचा प्रयत्न केल्याची घटना २७ऑगस्ट रोजी पहाटे उघडकीस आली. जसवंतसिंह चव्हाण हे कुटुंबासह पुण्याला गेले असताना चोरट्यांनी त्यांच्या घराचे तीन दरवाजे फोडले. घरातील साहित्याची नासधूस करून चोरटे वस्तू शोधत असतानाच पोलिसांच्या सायरनचा आवाज आल्याने त्यांनी तेथून पळ काढला. त्यामुळे मोठी चोरी टळली. घरातून नेमके काय चोरीला गेले, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेची माहिती मिळताच खामगाव शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक सुरेंद्र अहीरकर यांनी पथकासह घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता तीन चोरटे घरात प्रवेश करीत असल्याचे निदर्शनास आले.

सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांकडून तपास सुरू आहे.सकाळी रेकी, रात्री बंद घरांना लक्ष ? दिवसा परिसराची पाहणी करून रात्री बंद घरांना लक्ष्य केले जात असल्याचा पोलिसांचा संशय आहे. त्यामुळे नागरिकांनी घर काही काळासाठी बंद ठेवताना मौल्यवान वस्तूंच्या सुरक्षिततेची काळजी घ्यावी, तसेच संशयास्पद हालचाली आढळल्यास तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. बंद घरे चोरट्यांच्या निशाण्यावर कुटुंबीय बाहेरगावी गेल्याची संधी साधून बंद घरांमध्ये चोरी करण्याचे प्रकार घडत आहेत. त्यामुळे नागरिकांनी शेजाऱ्यांच्या संपर्कात राहून घराच्या सुरक्षेकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

शहरात चोरीच्या घटनांबाबत नागरिकांमध्ये चिंता वाढत असून, पोलिसांनी रात्रीची गस्त अधिक कडक करावी, अशी मागणी होत आहे.

# आमदार संजय कुटे यांच्या प्रयत्नांना यश

## 1 जुन रोजी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे संत्रा

प्रतिनिधी २८ ऑगस्ट



**संग्रामपूर :** अतिवृष्टी, पुर व चक्रीवादळ या सारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे शेतीपिकाचे नुकसान झाल्यास पुढील हंगाम मध्ये उपयोगी पडावे या करिता शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान स्वरूपात एका हंगामात एक वेळेस या प्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या इतर मान्य बाबी करिता देखील विहित दराने मदत देण्यात येते. शासन निर्णय महसूल व वण विभाग क्र. सी एल एस 2022/प क्र 349/ 3 दिनांक 27/3/23 अन्वये राज्य आपती प्रतिसाद निधीचे निकष व दर विहित करण्यात आले आहेत. केंद्र शासनाने विहित केलेल्या 12 नैसर्गिक आपत्ती व्यतिरिक्त राज्य शासनाने दीं 30/1/14 अन्वये अवेळी पाऊस, अतिवृष्टी, वीज कोसळणे, समुद्राचे उधाण, व आकस्मित आग, या स्थानिक आपत्तीमध्ये बाजी त्यांना मदत देण्याचे धोरण निश्चित केले आहे. तसेच दिनांक 22/6/23 च्या शासन निर्णया नवे सततचा पाऊस हा नैसर्गिक आपत्ती घोषित करण्यात आली आहे.

जून व जुलै 2026 या महिन्यात वादळी वारा व पाऊस या परिसरात पडला होता. यामुळे या परिसरातील संत्रा केळी तसेच इतर पिकाचे नुकसान झाले होते. जनजीवन अस्त व्यस्त झालं होतं. माहे जून व जुलै 2026 या महिन्यातील झालेल्या अतिवृष्टी सारख्या पावसामुळे बुलढाणा जिल्ह्यासह जळगाव जामोद मतदारसंघातील बऱ्याच गावातील नागरिकांचे घर व शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते या नुकसानीची पाहणी आमदार डॉक्टर संजय कुटे यांनी त्याच रात्री केली व सर्वांना आश्वासन दिले होते की शासनाकडून आपणास भरघोस मदत मिळण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे. त्याचा सतत पाठपुरावा राज्य सरकारकडे आमदार संजय कुटे यांनी केला असून त्याला यश प्राप्त झाले. बुलढाणा जिल्ह्यासाठी अकरा

## केळी पिकाची नुकसान भरपाई; बुलढाणा जिल्ह्यासाठी 11 कोटी 59 लाख रुपये मंजूर

कोटी ५९ लाख रुपयाची रक्कम शासनाकडून आपत्ती व अतिवृष्टी मध्ये नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरकारने जाहीर केली आहे. ही रक्कम शेतकऱ्याच्या खात्यात आधार व खाते संलग्नित केलेल्या डीबीटी सिस्टम द्वारे जमा होणार आहे. आमदार संजय कुठे यांनी पाठपुरावा केला व शासनाकडून भरीव निधी प्राप्त करून दिला यासाठी मतदारसंघातील शेतकरी वर्ग त्यांचे आभार मानत आहे.

# जळगावात महिला सुरक्षा मार्गदर्शन शिबिर

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**जळगाव जामोद :** सेठ तुळशीरामजी ढोकणे कला, वाणिज्य, विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, आसलगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने मंगळवारी महिला सुरक्षा मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. शिबिराच्या अध्यक्षस्थानी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला मंडळाच्या अध्यक्षा ॲड. ज्योती ढोकणे होत्या. पोलिस उपनिरीक्षक नागेश खाडे व ओबीसी महासंघाचे प्रदेश युवा अध्यक्ष सुरज बेलोकार हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे अध्यक्ष अभियंता प्रकाश ढोकणे, सरपंच विष्णू इंगळे, प्राचार्या ज्योती वानेरे, मुख्याध्यापिका प्रभा इंगळे व मुख्याध्यापक प्रवीण दाते यांची प्रमुख उपस्थिती होती. दीपप्रज्वलन व मान्यवरांच्या सत्कारानंतर नागेश खाडे, सुरज बेलोकार व ज्योती ढोकणे यांनी उपस्थित महिला व विद्यार्थिनींना महिला सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. तसेच शासनाकडून मिळणाऱ्या विविध शिष्यवृत्ती आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या योजनांची माहिती देण्यात आली. प्रास्ताविक प्राचार्या ज्योती वानेरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अतुल उमाळे यांनी केले, तर सूरज राखोंडे यांनी आभार मानले.

यावेळी शिक्षकवृंद, विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच महिला पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अतिक्रमणधारकांना पर्यायी व्यवस्था द्या

## रमाई घरकुल योजनेत पारदर्शकता ठेवा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट)चे तहसीलदारांना निवेदन

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**मलकापुर :** शहरातील बुलढाणा–चिखली महामार्गावरील अतिक्रमणधारकांना पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, रमाई घरकुल योजनेची लाभार्थी निवड पारदर्शक पद्धतीने करावी तसेच ३० जुलै २०२६ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या नागरिकांचे सर्वेक्षण करून त्यांना तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट)च्या वतीने तहसीलदार,मलकापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट)चे जिल्हाध्यक्ष ॲड. मनोज बागडे आणि तालुकाध्यक्ष भिवा चोपडे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले.



निवेदनात म्हटले आहे की, बुलढाणा–चिखली महामार्गालगत अनेक नागरिकांचे व्यवसाय व उपजीविका अवलंबून आहेत. अतिक्रमण हटविण्यापूर्वी संबंधित नागरिकांचे सर्वेक्षण करून पात्र अतिक्रमणधारकांना शासनाच्या नियमानुसार पर्यायी जागा किंवा पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी. रमाई घरकुल योजनेतील लाभार्थी निवडीत पारदर्शकता ठेवण्याची मागणीही करण्यात आली. पात्र व गरजू नागरिकांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करूनच लाभार्थी निवड करावी तसेच कोणताही गैरप्रकार किंवा पक्षपात होऊ नये, यासाठी संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तसेच ३० जुलै २०२६ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या नागरिकांचे तातडीने सर्वेक्षण करून नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. अतिवृष्टीमुळे नागरिकांच्या घरांचे व इतर मालमत्तेचे नुकसान झाले असून प्रशासनाने संवेदनशीलतेने पाहणी करून पात्र नागरिकांना शासन नियमानुसार मदत द्यावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या मागण्यांवर प्रशासनाने तातडीने कार्यवाही न केल्यास पुढील आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेऊन न्याय द्यावा, अशी अपेक्षा निवेदनकर्त्यांनी व्यक्त केली. या वेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवई गटाचे ता. अध्यक्ष भिवा चोपडे,शहर अध्यक्ष अशोक भालशंकर,ता. उपाध्यक्ष मुख्तार खान, समाधान पवार, गोपाळ चव्हाण हे उपस्थित होते.

# मेंढळीत दोन गटांत वाद; 13 जणांवर गुन्हा दाखल

## लाठ्या-काठ्यांनी परस्परांना मारहाण केल्याचा आरोप

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**नांदुरा :** नांदुरा तालुक्यातील मेंढळी येथे दोन गटांत लाठ्या-काठ्यांनी हाणामारी झाल्याची घटना गुरुवारी (दि. २७) दुपारी दीडच्या सुमारास घडली. याप्रकरणी दोन्ही गटांनी दिलेल्या परस्परविरोधी तक्रारींवरून बोराखेडी पोलिसांनी एकूण १३ जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. मेंढळी येथील बबिता प्रकाश सपकाळ यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, सुनीता अशोक इंगळे, अजय अशोक इंगळे, अशोक जगदेव इंगळे, अकोला येथील सुमनबाई आणि भुसावळ येथील गोविंदा तायडे यांनी एकत्र येत त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना काठीने मारहाण करून जखमी केले. या तक्रारीवरून पोलिसांनी संबंधित पाच जणांविरुद्ध गुन्हा नोंदविला.दुसऱ्या गटातील कोमल अजय इंगळेयांनीही पोलिसांत तक्रार दिली. प्रकाश दामोदर सपकाळ, मंगेश दामोदर सपकाळ, बबिता प्रकाश सपकाळ, दिव्या मंगेश सपकाळ, दिनेश झब्बर जैस्वाल, जया सुरेश जैस्वाल, दीक्षा सुरेश जैस्वाल आणि जळगाव जामोद तालुक्यातील मराखेड येथील शालू दर्शन सुरडकर यांनी आपल्यासह कुटुंबीयांना लाठ्या-काठ्यांनी मारहाण केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या तक्रारीवरून आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. हाणामारीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल विजय सुरळकर आणि पोलिस कॉन्स्टेबल रवींद्र नरोटे करीत आहेत.

# सोयाबीनवरील पाने खाणाऱ्या अळ्यांचे एकात्मिक व्यवस्थापन करण्याचे आवाहन

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**बुलढाणा :** जिल्ह्यातील बहुतांश भागात सध्या सोयाबीन पिकावर पाने खाणाऱ्या अळ्यांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. तंबाखूवरील पाने खाणारी अळी (स्पोडॉप्टेरा लिटुरा), उंट अळी, घाटे अळी आणि केसाळ अळी यांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने शेतकऱ्यांनी वेळीच एकात्मिक कीड व्यवस्थापनाच्या उपाययोजना कराव्यात, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्र व कृषी विभागाने केले आहे.

पाने खाणाऱ्या अळ्यांच्या व्यवस्थापनासाठी उन्हाळ्यात खोल नांगरणी करून जमिनीतील कोष नष्ट करावेत. मुख्य पिकाभोवती एरंडी किंवा सूर्यफुलाची एक ओळ सापळा पीक म्हणून लावावी. पिकाची नियमित पाहणी करून अंड्यांचे पुंजके तसेच समूहाने आढळणाऱ्या लहान अळ्या गोळा करून नष्ट कराव्यात. शेत तणमुक्त ठेवून संतुलित खत व्यवस्थापन करणेही आवश्यक आहे.

पतंगांच्या सर्वेक्षणासाठी हेक्टरी पाच कामगंध (फेरोमोन) सापळे लावून त्यामध्ये स्पोडोल्युअर किंवा हेलील्युअर प्रलोभकाचा वापर करावा. भक्षक पक्ष्यांचे संवर्धन करण्यासाठी प्रति एकर ८ ते १० पक्षीथांबे उभारावेत. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून ५ टक्के निंबोळी अर्क किंवा अझाडिरेक्टिन (१० हजार पीपीएम) ५ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करण्याची शिफारस करण्यात आली आहे. अळीचा प्रादुर्भाव दिसून येताच जैविक नियंत्रणासाठी बिव्हेरिया बॅसियाना ५ मिली प्रति लिटर, एस.एल.एन.पी.व्ही. (५०० एल.ई.) ५ मिली प्रति लिटर किंवा मेटारायझियम रिलायी ५ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यास रासायनिक नियंत्रण : कामगंध सापळ्यात सलग २ ते ३ दिवस प्रति सापळा ८ ते १० नर पतंग आढळल्यास किंवा फुलोऱ्यापूर्वी प्रति मीटर ओळीत १० तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळ्या आढळल्यास कीड नियंत्रणाची उपाययोजना करावी. तसेच शेंगा भरण्याच्या अवस्थेत प्रति मीटर ओळीत ३ उंट अळ्या किंवा ५ घाटे अळ्या आढळल्यास कीटकनाशकाची फवारणी करावी.

यासाठी क्लोरॅन्ट्रानिलिप्रोल १८.५ टक्के एससी १५० मिली प्रति हेक्टर या प्रमाणात फवारणी करावी. पर्याय म्हणून इमामेक्टिन बेंझोएट १.९० टक्के ईसी ४२५ मिली प्रति हेक्टर, फ्लुबेंडायामाइड २० टक्के डब्ल्यूजी २५० ते ३०० ग्रॅम प्रति हेक्टर किंवा फ्लुबेंडायामाइड ३९.३५ टक्के डब्ल्यू/डब्ल्यू एससी १५० मिली प्रति हेक्टर यापैकी कोणत्याही एका कीटकनाशकाचा वापर करता येईल. पाने खाणाऱ्या अळ्यांसह इतर किडींचा प्रादुर्भाव असल्यास : ज्या क्षेत्रात पाने खाणाऱ्या अळ्या, पांढरी माशी तसेच खोड कीड (गर्डल बीटल) यांचा एकाच वेळी प्रादुर्भाव आढळतो, अशा ठिकाणी थायामेथोक्झाम + लॅम्ब्डा-सायहॅलोथ्रिन १२५ मिली प्रति हेक्टर किंवा बेटासायफ्लुथ्रिन + इमिडाक्लोप्रिड ३५० मिली प्रति हेक्टर या मिश्र कीटकनाशकांची फवारणी करता येईल. याशिवाय क्लोरॅन्ट्रानिलिप्रोल ०९.३० टक्के + लॅम्ब्डा-सायहॅलोथ्रिन ०४.६० टक्के झेडसी २०० मिली प्रति हेक्टर किंवा इंडॉक्साकार्ब १५.८० टक्के ईसी ३३३ मिली प्रति हेक्टर यापैकी कोणत्याही एका कीटकनाशकाचा वापर करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

# नेपाळमध्ये अडकलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील नागरिक व पर्यटकांनी माहिती नोंदवावी; जिल्हा प्रशासनाचे आवाहन

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**बुलढाणा :** नेपाळमधील रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला आलेल्या पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, विविध देशांतील तसेच महाराष्ट्रातील नागरिक व पर्यटक अडकले असल्याची माहिती आहे. या पार्श्वभूमीवर बुलढाणा जिल्ह्यातील नेपाळमध्ये अडकलेल्या नागरिकांची माहिती संकलित करून त्यांना आवश्यक मदत व समन्वय उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत विशेष माहिती नोंदणी लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील कोणतेही नागरिक अथवा पर्यटक सध्या नेपाळमध्ये अडकले असतील किंवा त्यांचा कुटुंबीयांशी संपर्क होत नसेल, तर त्यांच्या कुटुंबीयांनी किंवा नातेवाईकांनी https://geospatial.mahaseoc.in/Sahayata_gulf/ या लिंकवर जाऊन संबंधित व्यक्तीची सविस्तर माहिती नोंदवावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

माहिती नोंदविताना संबंधित व्यक्तीचे नाव, मोबाईल क्रमांक, नेपाळमधील सध्याचे ठिकाण अथवा हॉटेल, प्रवासाचा तपशील आणि उपलब्ध असल्यास कुटुंबीयांचा संपर्क क्रमांक अचूकपणे नमूद करावा. तसेच, नागरिकांनी किंवा त्यांच्या नातेवाईकांनी संबंधित तहसील कार्यालय अथवा जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे तात्काळ संपर्क साधावा. जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्ष, बुलढाणा : ०७२६२-२४२६८३ पोलीस नियंत्रण कक्ष : ०७२६२-२४२४०० टोल फ्री : १०७७ मोबाईल : ७०२०४३५९५४

नेपाळमधील आपत्तीग्रस्त भागात अडकलेल्या नागरिक व पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक माहिती संकलित करून संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्याचे प्रयत्न जिल्हा प्रशासनामार्फत सुरू आहेत. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता उपलब्ध अधिकृत माध्यमांद्वारे माहिती नोंदवून जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केले आहे.

# घरासमोरून 30 हजारांची दुचाकी चोरीला

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**मलकापूर :** शहरातील दीपकनगर परिसरात घरासमोर उभी केलेली सुमारे ३० हजार रुपये किमतीची जुनी दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केली. ही घटना २३ ऑगस्ट रोजी दुपारी घडली. याप्रकरणी २६ ऑगस्ट रोजी मलकापूर शहर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संभाजीराव शिवाजी कुयटे (४४, रा. खामखेड, ता. मलकापूर, ह.मु. दीपकनगर, मलकापूर) यांनी त्यांची मोटारसायकल (एमएच २८ एके ८३७३) घरासमोर



उभी केली होती. २३ ऑगस्ट रोजी दुपारी १ ते १:३० वाजेच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने ही दुचाकी चोरून नेली. दुचाकी दिसत नसल्याने कुयटे यांनी शेजारी राहणारे जयवंत कुलकर्णी यांच्याकडे चौकशी केली; मात्र त्यांनाही चोरीबाबत माहिती नसल्याचे समोर आले. त्यानंतर परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. त्यामध्ये एक युवक दुचाकी घेऊन जाताना दिसून आला.

# जनता महाविद्यालयात एकदिवसीय पोलीस भरती प्रशिक्षण कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**मलकापुर :** जनता महाविद्यालयाद्वारे आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय पोलीस भरती प्रशिक्षण कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्थानिक जनता कला वाणिज्य महाविद्यालय मलकापूर येथे एक दिवसीय पोलीस भरती प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. ही कार्यशाळा जनता महाविद्यालयातील व्यवसाय व समुपदेशन विभाग आणि राष्ट्रीय छात्र सेना विभाग (एनसीसी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली- ही कार्यशाळा मलकापूर परिसरातील महाराष्ट्र पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या सर्वच युवक युवतींसाठी खुली व पूर्णपणे मोफत अशा स्वरूपात होती. मलकापूर परिसरातील



मोठ्या संख्येने युवक युवती महाराष्ट्र पोलीस विभागात भरतीसाठी तयारी करत आहेत. अशा युवकांना पोलीस भरतीतील शारीरिक चाचणी व लेखी परीक्षा संबंधी विस्तृत मार्गदर्शन व प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली असे प्रतिपादन आपल्या प्रास्ताविकातून कार्यशाळेचे आयोजक व व्यवसाय व समुपदेशन विभागाचे समन्वयक प्रा. टी. पी. मोरे यांनी केले. या कार्यशाळेला मलकापूर परिसरातील युवक युवतींचा मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मोठ्या संख्येने युवक युवतींनी या कार्यशाळेला उपस्थिती दर्शवली होते या कार्यशाळेत मैदानी प्रशिक्षक म्हणून महाराष्ट्र पोलीस विभागातील रविंद्र सपकाळ तसेच नांदुरा येथील पार्थ फिजिकल अकॅडमी चे तुषार पाटील यांची उपस्थिती लाभली होती- तसेच लेखी परीक्षा विषयक मार्गदर्शन करण्यासाठी मलकापूर येथील साहस अकॅडमीचे संचालक विशाल पाटील हे प्रमुख प्रशिक्षक म्हणून उपस्थित होते- ही कार्यशाळा तीन सत्रात संपन्न झाली. या कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात रविंद्र सपकाळ यांनी पोलीस भरतीतील मुलांसाठी असणारे 100 मीटर व 1600 मीटर तर मुलींसाठी असणारे 100 मीटर व 800 मीटर धावण्याची परीक्षा तसेच गोळा फेक याची तयारी कशी करावी, तयारी करताना दक्षता कोणती घ्यावी व आपला परफॉर्मन्स कोअर कसा वाढवावा यासंबंधी विस्तृत असे मार्गदर्शन केले. तसेच प्रत्यक्ष मैदानावर धावणे व गोळा फेकीचा सराव तुषार पाटील यांनी प्रशिक्षणार्थ्यांचा सराव करून घेण्यात आला.

या कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात पोलीस भरतीतील लेखी सराव परीक्षा घेण्यात आल. कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्रात महाराष्ट्र पोलीस भरतीतील लेखी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती याविषयी विस्तृत असे मार्गदर्शन विशाल पाटील यांनी केले. योग्य दर्जाचे मार्गदर्शन या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी जनता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधीर चव्हाण हे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून उच्च दर्जाचे मार्गदर्शन, प्रचंड मेहनत व प्रयत्नांचे सातत्य या त्रिसूत्रींच्या आधारावर यश हमखास मिळू शकते असा विश्वास व्यक्त केला तसेच उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांना पोलीस विभागातील निवडीकरिता शुभेच्छा ही दिल्या. या कार्यशाळेला मलकापूर परिसरातील जनता महाविद्यालयाबरोबरच विज्ञान महाविद्यालय, अग्रवाल महाविद्यालय, समाजकार्य महाविद्यालय अशा विविध महाविद्यालयातून एकूण 143 युवक युवतींनी सहभाग नोंदवला होता.

# बहीण-भावाच्या अतूट प्रेमाचा उत्सव साजरा, बाजारपेठा सजल्या

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**अकोला:** रक्षाबंधन हा बहीण-भावाच्या पवित्र आणि अतूट प्रेमाचा सण असून आज शुक्रवारी (२८ ऑगस्ट) भारतभर ठिकठिकाणी हा सण पारंपरिक रीतीने साजरा झाला. अकोला शहर तसेच ग्रामीण भागातही हा सण उत्साहाने साजरा होत असतो. यानिमित्त बाजारपेठाही विविध रंगांच्या, आकाराच्या आणि प्रकारच्या राख्यांनी सजल्याचे दिसून आले. दरम्यान, शुक्रवारी खंडग्रास चंद्रग्रहण असले तरी ते भारतातून दिसणार नसल्यामुळे रक्षाबंधनाच्या बाबतीत वेधादी नियम पाळू नयेत, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. रक्षाबंधन हा सण हिंदू पंचांगानुसार श्रावण महिन्याच्या पौर्णिमेला साजरा केला जातो.











या दिवशी बहीण आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधते आणि त्याच्या दीर्घायुष्यासाठी व सुरक्षिततेसाठी प्रार्थना करते. बहीण भावाला ओवाळते,

त्याच्या कपाळी कुंकू व अक्षता लावते आणि त्याला गोडधोड भरवते. त्या बदल्यात भाऊ बहिणीला संरक्षण देण्याचे वचन देतो आणि तिला भेटवस्तू देत असतो. आज सकाळपासून घरांमध्ये रक्षाबंधनाचा उत्साह दिसून आला. बहिणाभावाच्या अतुट प्रेमाचा हा दिवस असून बहिणी भावांची आतुरतेने वाट पाहतात. तसेच दूर वर असलेला भाउ बहिणीकडे पोहचू शकला नाही तर बहिण चंद्राला भाउ मानून त्याची ओवाळणी करतात.

### रक्षाबंधन सणाबाबतची प्रसिद्ध आख्यायिका

अकोला शहरातील बाजारपेठेत वेगवेगळ्या रंगाच्या आणि डिझाईनच्या राख्या उपलब्ध आहेत. राखीचा सण चुलत भाऊ, मावस भाऊ, मामे भावासह देखील साजरा करतात. या दिवशी घरात सर्व कुटुंबीय एकत्र येऊन सण साजरा करतात. या सणाची एक आख्यायिका आहे की, देवासुर संग्रामात देवांचा विजय व्हावा यासाठी इंद्राणीने इंद्राच्या हाताला राखी बांधली होती. याचप्रमाणे इतरही अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत.

### दृष्टिकोन बदलण्याची आहे आवश्यकता

रक्षाबंधन म्हणजे स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे, रक्षाबंधन म्हणजे भावाने बहिणीच्या रक्षणाची जबाबदारी घेणे, रक्षाबंधन म्हणजे बहीण-भावाच्या शुद्ध प्रेमाचा वाहता निर्झर असतो. भाऊ आणि बहीण परस्पर प्रेरक, पोषक आणि पूरक आहेत हा संदेश देणारा हा उत्सव भारतीय संस्कृतीची अमूल्य देण आहे.

## नगरसेविका निलोफर खान यांनी मनपाच्या कारभारावर उठवले प्रश्न

### जुना डीपी प्लान प्रलंबित, मग नवीन कशासाठी: निलोफर खान

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**अकोला:** महानगरपालिकेच्या सभेत नगरसेविका निलोफर खान यांनी विकास आराखडा आणि खुल्या जागा आरक्षणाच्या मुद्द्यावरून प्रशासनाला धारेवर धरले. जुना डीपी प्लान न राबवता नवीन योजना आणण्याच्या औचित्यावर त्यांनी गंभीर सवाल उपस्थित केले.



अकोला महानगरपालिकेच्या सभेत नगरसेविका निलोफर खान यांनी विकास योजना अर्थात डीपी प्लान आणि जागा आरक्षण प्रक्रियेवर प्रशासकीय दिरंगाईचा आरोप करत जोरदार हल्लाबोल केला. जुना डीपी प्लान अधिग्रहित करण्यात प्रशासन अपयशी ठरले असताना नवीन विकास योजनेचा काय फायदा, असा सवाल त्यांनी माध्यमांशी बोलताना केला. या योजनेसाठी स्वतंत्र नियोजन समिती स्थापन करण्याची मागणी त्यांनी केली. राज्य सरकारसह उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयानेही यासंदर्भात मनपाला स्पष्ट निर्देश दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय, 'जेन झी' आणि 'जेन अल्फा' या भावी पिढ्यांच्या आरोग्यासाठी आणि शिक्षणासाठी मोकळ्या जागा व शाळांचे आरक्षण राखणे अत्यंत गरजेचे आहे. एक आर्किटेक्ट आणि लोकप्रतिनिधी म्हणून शहराचा योग्य विकास घडवून आणणे आपली जबाबदारी असल्याचे त्या म्हणाल्या.

## अकोल्यात हेल्मेट सक्ती कायम: पोलिसांची कडक कारवाई सुरु

### दुचाकीस्वारांनो सावधान: हेल्मेट न घातल्यास दंडात्मक कारवाई

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**अकोला :** १ ऑगस्टपासून सुरू झालेली हेल्मेट सक्ती थंडावलेली नसून, पोलिसांनी आज विविध ठिकाणी धडक तपासणी केली. नियम मोडणाऱ्या दुचाकीस्वारांवर दंडात्मक कारवाई करत पोलिसांनी निष्काळजी वाहनधारकांना कडक इशारा दिला आहे. अकोला शहरात दुचाकीस्वारांसाठी हेल्मेट सक्ती कायम असून, वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. काही चालकांनी या सक्तीला गांभीर्याने न घेतल्याने आज शहरात विविध ठिकाणी अचानक



तपासणी मोहीम राबवण्यात आली. या कारवाईदरम्यान हेल्मेट न घालता दुचाकी चालवणाऱ्या चालकांना थेट दंड ठोठावण्यात आला. याशिवाय, बुलेटच्या सायलेन्सरमध्ये फेरफार करून मोठा आवाज करणाऱ्या वाहनधारकांचा शोध घेऊन त्यांना कडक ताकीद देण्यात आली. हेल्मेट सक्तीत कोणतीही शिथिलता देण्यात आलेली नाही, हेच या मोहिमेतून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे अकोलेकरांनी दंडात्मक कारवाई टाळण्यासाठी आणि स्वतःच्या सुरक्षेसाठी हेल्मेट घालूनच वाहन चालवावे, असा स्पष्ट संदेश प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

## अकोला मनपा सभेत तांत्रिक त्रुटींवरुन सुनील इन्नाणी यांचा आक्षेप

### लेआउट मंजुरीत फेरफार करणाऱ्यांवर कारवाईचे प्रशासनाचे आश्वासन

**अकोला :** महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील सॉफ्टवेअरमधील तांत्रिक त्रुटी आणि त्या आधारे दिलेल्या बेकायदेशीर लेआउट मंजुरींवरून महापालिकेच्या सभेत वाद पाहायला मिळाला. या विषयावर वंचित नगरसेवक सुनील इन्नाणी यांनी प्रशासनाला सकारात्मक सुचना केल्याची माहिती आहे.



नगररचना विभागाच्या ऑनलाइन प्रणालीतील त्रुटींचा गैरफायदा घेऊन काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नियमबाह्य लेआउट आणि आरक्षणाच्या जागांना मंजुरी दिल्याचा आरोप सभेत करण्यात आला. महाराष्ट्रातील सुमारे ४०० नागरी संस्था ही प्रणाली वापरत असून, आयटी विभागाच्या माध्यमातून या तांत्रिक त्रुटींवर तातडीने तोडगा काढला जाईल, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. तांत्रिक त्रुटी नजरेसमोर असतानाही हेतूपूर्वक मंजुरी देणाऱ्यांवर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी कमिटमेंट यावेळी वंचित नगरसेवक सुनील इन्नाणी यांनी मागितली. संबंधित गैरप्रकारांचे सर्व पुरावे आणि कागदपत्रे महापालिका आयुक्तांकडे चौकशीसाठी सोपवण्यात आले आल्याची माहिती मिळाली. यासह इतर विषयावर नगरसेवक सुनील इन्नाणी यांनी मत व्यक्त केले.

## मनपा डीपी प्लान फेरबदलावरून महापालिकेत राजकारण तापले, सत्ताधारी-विरोधकांमध्ये घमासान

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**अकोला :** महानगरपालिके च्या सभेत विकास योजना अर्थात डीपी प्लान फेरबदलाच्या विषयावरून मोठा वाद उफळला. महापालिकेत सादर झालेल्या प्रस्तावावर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार आरोप-प्रत्यारोप पाहायला मिळाले.

अकोला महानगरपालिकेच्या सभेत डीपी प्लानमधील बदलांवरून सत्ताधारी भाजप आणि प्रशासनावर गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले. महापालिकेने पाठवलेला डीपी प्लान आधीच राज्य शासनाकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहे. नियम आणि कायद्यानुसार यामध्ये फेरबदल करण्याचे अधिकार केवळ राज्य शासनाला आहेत. असे मत वंचित नगरसेवक निलेश देव यांनी व्यक्त केले. असे असतानाही महापालिकेत पुन्हा प्रस्ताव आणून चर्चा घडवून आणणे चुकीचे आहे. जागांचे आरक्षण बदलणे आणि प्रभाग स्तरावरील आरक्षित भूखंडांची अदलाबदल करणे हे केवळ आर्थिक फायद्यासाठी केले जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.





राज्य शासनाकडे पाठवलेल्या प्रस्तावात पुन्हा फेरबदल करण्याच्या निर्णयाचा जोरदार निषेध विरोधी पक्ष नेता डॉ.जीशान हुसेन यांनी नोंदविला. भाजपच्या या भूमिकेवर सवाल उपस्थित करताना विरोधकांनी विचारले की, राज्य सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्याकडे हे प्रकरण प्रलंबित असताना मनपा सभेत पुन्हा प्रस्ताव का आणला गेला. डीपी प्लानमधील अशा बेकायदेशीर बदलांमुळे कोट्यवधींचा भ्रष्टाचार होत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. हा निर्णय कायद्यात बसणारा नसून, राज्य शासन किंवा उच्च न्यायालयाकडून हा ठराव १०० टक्के विखंडित केला जाईल, असा विश्वास व्यक्त करत विरोधकांनी या विषयावर आक्रमक भूमिका घेतली.

## सोनोग्राफी साठी किती तास ताटकळत बसायचे

### जीएमसी प्रशासनाला रूग्णांचा सवाल



प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**अकोला :** सोनोग्राफी साठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सर्वोपचार रूग्णालयात सकाळी १० वाजेपासून दुपारी २ वाजेपर्यंत नंबर लागत नाही. यातील काही गंभीर आजार असणारे रूग्ण होते. अशा धिम्या गतीने सोनोग्राफी प्रक्रिया सुरू असल्याने रूग्ण व त्यांचे नातेवाईक संताप व्यक्त करीत आहेत. जिल्हा सर्वोपचार रूग्णालयात अकोला जिल्हा तसेच नजीकच्या भागातील रूग्ण येतात. गंभीर आजार असलेले तसेच रूग्णालयात भरती अन्य रूग्णांना देखील सोनोग्राफी काढावी लागते. तातडीने रिपोर्ट मिळाला तर निदान आणि उपचार सुरू होऊ शकतो.

परंतु चार तास रांगेत बसावे लागत असेल तर पुढची प्रक्रिया कधी पूर्ण होईल असा सवाल काही रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी उपस्थित केला. वरिष्ठांनी या प्रकाराची दखल घ्यावी तसेच सोनोग्राफी रिपोर्ट तातडीने मिळतील याकडे लक्ष द्यावे अशी मागणी आहे.

## आंबेडकर चौक शिवणी येथील अतिक्रमणावर कारवाई

### शिवणी परिसरात रस्ते मोकळे; अतिक्रमण हटाव मोहीम

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**अकोला :** शिवणी येथील आंबेडकर चौक परिसरात रस्त्याला अडथळा ठरणारे अतिक्रमण प्रशासनाकडून हटवण्यात आले. या धडक कारवाईमुळे परिसरातील मुख्य रस्ते मोकळे झाले असून नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला आहे. शिवणी परिसरातील आंबेडकर चौक येथे असणारे बेकायदेशीर अतिक्रमण प्रशासनाने धडक कारवाई करत हटवले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या चौकात अतिक्रमाणामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत होता, तसेच अपघातांची शक्यताही वाढली



होती. याबाबत स्थानिक नागरिकांकडून प्रशासनाकडे सातत्याने तक्रारी केल्या जात होत्या. या तक्रारींची दखल घेत पोलीस बंदोबस्तात प्रशासकीय पथकाने अचानक कारवाई करत आंबेडकर चौकातील दुकाने व अस्थायी बांधकामे हटवून परिसर मोकळा केला. अचानक झालेल्या या कारवाईमुळे अतिक्रमणधारकांचे धाबे दणाणले. वाहतूक सुरळीत करण्यासाठी आणि भविष्यात पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी प्रशासन सतर्क राहील, असा इशारा देण्यात आला आहे.

## रक्षाबंधनच्या सुट्टीतही जिल्हा परिषदेत लगबग; पंचायत राज समितीच्या पाहणीपूर्वी कागदांची जमवाजमव

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**अकोला :** महाराष्ट्र विधिमंडळाच्या पंचायत राज समितीच्या अकोला दौऱ्याची तयारी सुरू असतानाच जिल्हा परिषद प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले. आज नारळी पौर्णिमा अर्थात रक्षाबंधनाचा सण असतानाही जिल्हा परिषदेतील विविध विभागांमध्ये अधिकारी-कर्मचाऱ्यांची उपस्थिती दिसून आली. समितीच्या पाहणीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाची कागदपत्रे, अहवाल आणि विभागनिहाय माहितीची जमवाजमव सुरू असल्याचे चित्र होते. जिल्हा परिषदेतील पंचायत राज, आरोग्य, सामान्य प्रशासन, बांधकाम, कृषी, शिक्षण यांसह इतर विभागांमध्येही हालचाली सुरू होत्या. काही कार्यालये बाहेरून बंद असल्याचे दिसत असले तरी आतील





कामकाज मात्र सुरू असल्याचे चित्र होते. विविध फाईली, कागदपत्रे आणि अहवालांची जुळवाजुळव करण्यासाठी अधिकारी-कर्मचारी व्यस्त असल्याचे दिसून आले.

पंचायत राज समितीच्या दौऱ्यात जिल्हा परिषद, पंचायत समित्या, प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हा परिषद शाळा तसेच ग्रामपंचायतींच्या कामकाजाचा आढावा घेतला जाणार आहे. लेखापरीक्षणातील मुद्दे, विकासकामे, विविध योजनांची अंमलबजावणी आणि निधीच्या वापराबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली जाणार असल्याने प्रशासनाकडून तयारीला वेग आला आहे.

दरम्यान, सणाच्या दिवशीही जिल्हा परिषदेत सुरू असलेली ही लगबग नेमकी समितीच्या पाहणीसाठी कागदपत्रांची पूर्तता करण्यापुरती आहे की नियमित प्रशासकीय कामकाजाचा भाग आहे, याबाबतही चर्चा सुरू झाली आहे. पंचायत राज समितीसमोर कोणते प्रश्न उपस्थित होतात आणि जिल्हा परिषदेच्या कोणत्या विभागांच्या कामकाजावर समितीचे लक्ष केंद्रित होते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पुंडलिक बाबा गोरक्षण येथे 21 दांपत्य द्वारा पार्थिव शिवलिंग रुद्राभिषेक व बगलामुखी माता हवन संपन्न

प्रतिनिधी २८ ऑगस्ट

**मुर्तीजापूर :** शहरातील पुंडलिक बाबा गौरक्षण येथे धार्मिक वातावरणात २१ दांपत्य हस्ते रुद्राभिषेक तसेच बगलामुखी माता हवन मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने संपन्न झाले. नलखेड (उज्जेन )वरून माता बगलामुखी माता मंदिराचे महत महाराज कुलदीप आणि त्यांचा शिक्षा द्वारे कडून यावेळी परिसरात मंत्रोच्चार, धार्मिक विधी आणि भक्तिमय वातावरणामुळे अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते. भजन गायक कुमार योगेश यांच्याकडून शिव कीर्तन करून रुद्राभिषेकाच्या विधीमध्ये २१ दाम्पत्यांनी सहभागी होत भगवान महादेव ची विधिवत



पूजा-अर्चना केली. त्यानंतर बगलामुखी माता हवन विधीवत पार पडला. यावेळी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेतला. कार्यक्रमादरम्यान उपस्थित भाविकांनी भगवान महादेव व बगलामुखी माता यांचे दर्शन घेतले.

गोविंद जि.प. कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था म.काकडदाती पुसद र.न.1071

वार्षिक आमसभेची नोटीस

दि. 29 ऑगस्ट 2026

या व्दारे गोविंद जि.प. कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था म. काकडदाती ची वार्षीक सर्वसाधारण सभा रविवार दि. 13 सप्टेंबर 2026 रोजी सकाळी 10.30 वाजता परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी व निर्णय घेण्याकरिता आयोजित करण्यात येत आहे. तरी कृपया सभेला उपस्थित राहावे.

**स्थळ : पुसद अर्बन जि.प. कर्मचारी सहकारी संस्था तलाव ले आउट पुसद चे सभागृह**

**नितीन पवार** अध्यक्ष

**इर्शाद मिर्झा** सचिव

**परिशिष्ट 'अ'**

दिनांक 13 सप्टेंबर 2026 रोजी आयोजित केलेल्या आमसभेत चर्चील्या जाणा-या विषयाची यादी पुढीलप्रमाणे

☆ **सभेतील विषय**

1) मागील आम सभेचे अहवाल वाचन व ते कायम करणे.
2) 31 मार्च 2026 रोजी संपण्या-या वर्षाचे नफा तोटा पत्रक व ताळेबंद मंजूर करणे.
4) सन 2026-2027 च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
5) सन 2025-2026 च्या लेखा परिक्षकाच्या अहवालाची नोंद घेणे.
6) सन 2026-2027 साला करिता वैधानिक लेखा परिक्षकाची नियूक्ती करणे.
7) संस्थेच्या पोट नियम दुरुस्तीस मान्यता देणे.
8) अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.

**सुचना-**

1) गणपूर्ती अभावी तहकुब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी एक तासानंतर घेण्यात येईल अशा सभेला गणपूर्तीचे बंधन राहणार नाही.
2) संस्थेच्या अहवाल वर्षातील कामकाजा संबंधी विचारावयाचे प्रश्न आमसभेच्या 5 दिवस अगोदर लेखी स्वरूपात संस्थेच्या कामकाजाच्या वेळेत द्यावेत. त्या नंतर अथवा वेळेवर विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तर देणे बंधनकारक राहणार नाहीत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135